**सुविचार**
यदि आप हर कार्य पूरी लगन से करते हैं
तो आपको कभी पछताना नहीं पडेगा ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. २४ ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८३ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# भाजपच्या आमदारांवर आता टांगती तलवार

मुंबई/नागपूर : लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपकडून शिंदे गटाला आणि अजित पवार गटाला सर्व्हे दाखवून अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्यामुळे शिंदे आणि अजित पवार गटामध्ये चांगलीच नाराजी पसरली होती. आता हाच पॅटर्न भाजपच्या विद्यमान आमदारांवर सुद्धा येण्याची शक्यता आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपकडून सुद्धा आता अंतर्गत तयारी सुरू करण्यात आली आहे. आता यामध्ये संघ सुद्धा सक्रिय झाला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी निश्चित करण्यासाठी विद्यमानदारांना सर्व्हेला तोंड द्यावे लागणार आहे.



भाजप आणि संघाचा सर्व्हे भाजपच्या विद्यमान आमदारांचे भविष्य ठरवणार आहेत. त्यामुळे सर्व्हेची टांगती तलवार आमदारांवर असल्याची चर्चा आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि संघाकडून आणखी दोन सर्वे क्षण केले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या सर्वेक्षणानंतरच विद्यमान आमदारांमध्ये कोणाला उमदेवारी द्यायची आणि कोणाचा पत्ता कट करायचा यावर निर्णय होणार आहे. त्यामुळे विद्यमान आमदारांमध्ये आता सर्व्हेची धास्ती लागून राहिली आहे. गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये लाडकी बहीण योजनेवरून माहोल करण्याचा प्रयत्न सुरू असला, तरी जागा वाटपावरून मात्र अजूनही या तिन्ही पक्षांमध्ये एकमत झालेले नाही. भाजप किती जागा लढवणार, अजित पवार गटाला किती जागा मिळणार आणि शिंदे गटाला किती जागा मिळणार? यावर **(पान ७ वर)**

## महाराष्ट्राची लोकप्रिय कबड्डी ऑलिंपिकमध्ये खेळली जाणार

वॉर्सा : महाराष्ट्रात लोकप्रिय असलेला कबड्डी खेळ ऑलिम्पिकमध्ये खेळला जाण्याची शक्यता आहे. याबद्दल माजी खेळाडू आणि पोलंडच्या कबड्डी महासंघाचे अध्यक्ष मिचल स्पिक्झको यांनी सूचक विधान केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोलंडच्या कबड्डी संघाचे अध्यक्ष मिचल स्पिक्झको यांची भेट घेतली. मोदींनी पोलंडमध्ये कबड्डी लोकप्रिय करण्यासाठी तसेच भारतीय आणि तेथील खेळाडूंमध्ये अधिक स्पर्धा आयोजित करण्याबाबत चर्चा केली.

नरेंद्र मोदींसोबतच्या भेटीनंतर स्पिक्झको यांनी विविध बाबीवर प्रकाश टाकला. त्यांच्याकडून खूप सकारात्मक ऊर्जा मिळाली आणि अहमदाबादमध्ये स्टेडियम बांधल्याबद्दल त्यांचे कौतुक केले, जिथे मी २०१६ मध्ये विश्र्वचषकादरम्यान खेळलो होतो. २०३६ मधील ऑलिम्पिक भारतात होईल याला आमचे समर्थन आहे. कबड्डी लवकरच ऑलिम्पिकसारख्या मोठ्या व्यासपीठावर दिसेल, अशी आशा बाळगूया, असे स्पिक्झको यांनी सांगितले.

**(पान ७ वर)**

## ३ सप्टेंबरपासून एसटी कर्मचाऱ्यांचा संप



मुंबई/बुलडाणा : मंगळवार दि. ३ सप्टेंबरपासून एसटी कर्मचारी मोठे आंदोलन छेडण्याच्या तयारीत असून एस. टी. कर्मचारी कृती समितीने सरकारला संपाचा इशारा दिला आहे. यामुळे ऐन सणासुदीच्या दिवसात प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता आहे.

राज्यभरातील एस. टी. कर्मचारी पुन्हा एकदा संपावर जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. राज्यातील एसटी कर्मचारी संघटनेच्या कृती समितीची शुक्रवार दि. २३ ऑगस्ट रोजी बुलडाणा येथे बैठक झाली. या बैठकीत एसटी कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचा-यांनुसार वेतन देण्यात यावे या मागणीसाठी येत्या ३ सप्टेंबरपासून राज्यभरात एसटी कर्मचारी मोठे आंदोलन करणार असल्याचा इशारा आज देण्यात आला आहे. ३ सप्टेंबरनंतर गणेशोत्सव सुरू होतो. मात्र या काळातही एसटी कर्मचा-यांनी आंदोलन पुकारले तर प्रवाशांचा मोठे हाल होऊ शकतात. त्यामुळे राज्य सरकारने आमच्या मागण्या लवकर मान्य कराव्या, असा इशाराही कृती समितीच्या पदाधिका-यांनी दिला आहे.

या अंदोलना विषयी बोलताना कृती समितीच्या पदाधिकारी म्हणाले की महाराष्ट्राची जीवनवाहिनी लालपरी हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे. वाहतुकीच्या बाबतीत महाराष्ट्र परिवहन मंडळ हे आशिया खंडात एक नंबरला आहे. या स्थितीत राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे पगारवाढ मिळावी, यासाठी विविध संघटनांच्या माध्यमातून ही कृती समिती तयार झाली आणि २०१६ पासून आमची मागणी राज्यकर्त्यांपर्यंत आम्ही वेळोवेळी आंदोलन करून पोहोचवण्याचा प्रयत्न केला. राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वेतन देण्याचा आम्हाला आश्वासन दिले. परंतु, ती मागणी अद्यापही पूर्ण झालेली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अतिसंवेदनशील **(पान ७ वर)**

# न्यायालयाच्या निर्देशानंतर महाविकास आघाडीचा बंद मागे

मुंबई : बदलापूरमध्ये घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्यावतीने शनिवारी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्र बंदच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर उच्च न्यायालयात शुक्रवारी सुनावणी पार पडली. यावेळी उच्च न्यायालयाने हा महाराष्ट्र बंद बेकायदेशीर असून राजकीय पक्षाला कोणत्याही प्रकारे महाराष्ट्र बंद करण्याचा अधिकार नाही, असा निर्णय दिला. उच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर महाविकास आघाडी काय भूमिका घेणार? याकडे अनेकांचे लक्ष लागले होते.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट करत उद्याचा महाराष्ट्र बंद मागे घेण्याचे आवाहन केले होते. यानंतर काँग्रेसने भूमिका स्पष्ट करत महाराष्ट्र बंद मागे घेत असल्याचे स्पष्ट केले. यानंतर शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत महाराष्ट्र बंद मागे घेत असल्याचे स्पष्ट केले. काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाकडून राज्यात विविध ठिकाणी काळा झेंडा आणि तोंडाला काळी पट्टी बांधून आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

उच्च न्यायालयाचा निर्णय आम्हाला मान्य नाही. मात्र, न्यायालयाच्या निर्णयाचा आदर ठेवावा लागतो. उद्याचा बंद आम्ही मागे घेत आहोत. मात्र, महाराष्ट्रभर आम्ही महाविकास आघाडीची सर्व नेते आणि कार्यकर्ते हातामध्ये काळे झेंडे घेऊन आणि तोंडाला काळी पट्टी बांधून आम्ही घडलेल्या घटनांचा निषेध करणार आहोत, असं उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा आदर करून आम्ही उद्या काळा झेंडा घेऊन आणि तोंडाला काळी पट्टी बांधून उद्या सकाळी ११ वाजता आंदोलन नाही **(पान ७ वर)**

## जागतिक कुस्तीमध्ये भारतीय मुलींचा दबदबा

नवी दिल्ली : जॉर्डन येथे सुरू असलेल्या १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत भारतीय महिला कुस्तीपटूंनी आपला दबदबा निर्माण केला असून कुस्तीच्या विविध वजन गटात देशासाठी एक दोन नाहीतर ४ सुर्वणपदके पदके जिंकली आहेत. भारतीय कुस्तीपटूंच्या या कामगिरीमुळे ऑलिम्पिकमधील कुस्तीतील अपयशाचे दुःख काहीसे कमी झाले आहे.



४३ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत आदिती कुमारीने ग्रीसच्या मारिया लुईझा गिका हिचा ७-० असा पराभव करत सुवर्णपदक जिंकले. ५७ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत नेहाने जपानच्या सो त्सुत्सुईचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. ६५ किलो वजनी गटात पुलकितने डारिया फ्रोलोव्हाचा ६-३ असा पराभव करत सुवर्णपदक जिंकले. मानसी लाथेरने ७३ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत हाना पिरस्काया हिला हरवून सुवर्णपदक जिंकले. सुवर्णपदक जिंकून या चार कुस्तीपटूंनी जागतिक स्पर्धेत भारतीय कुस्तीचा दबदबा प्रस्थापित केला.

हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी यांनी मानसी लाथेरचे ७३ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले आहे. लाथेर हा हरियाणाच्या जिंदमधील जुलाना भागातील लाजवाना कलान गावचा रहिवासी आहे.

ऑलिम्पिकमध्ये हुकले सुवर्णपदक

पॅरिस ऑलिम्पिकमध्येही भारताने कुस्तीमध्ये चांगली कामगिरी केली होती. अमन सेहरावतने ५७ किलो वजनी गटात सलग ३ विजय नोंदवून कांस्यपदक पटकावले होते. ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत अमेरिकन कुस्तीपटूला पराभूत करून विनेश देशाला २०२४ च्या ऑलिम्पिकमधील **(पान ७ वर)**

## नीरज चोप्राने पॅरिस ऑलिम्पिकचा स्वत:चाच विक्रम मोडला

नवी दिल्ली : भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राची भालाफेकीत ऐतिहासिक कामगिरी सुरूच आहे. नीरज प्रत्येक इव्हेंटमध्ये त्याच्या थ्रोची श्रेणी सतत वाढवत आहे. हा ट्रेंड लॉसने डायमंड लीगमध्ये चालू राहिला. नीरजने २२ ऑगस्टच्या रात्री लॉसने डायमंड लीगमध्ये पॅरिस ऑलिम्पिकचा विक्रम मोडला आणि आपल्या कारकिदीर्तील सर्वोत्तम थ्रो फेकले. या थ्रोच्या जोरावर तो दुस-या क्रमांकावर राहिला.



नीरज चोप्रा जेव्हा लॉसने डायमंड लीगमध्ये पोहोचला तेव्हा दुखापतीमुळे त्याच्या कामगिरीबद्दल चाहत्यांमध्ये शंका होती. मात्र सहाव्या प्रयत्नात त्याने कारकिदीर्तील सर्वोत्तम थ्रो फेकून दुसरे स्थान मिळवले आणि झुरिच येथे होणा-या डायमंड लीगच्या अंतिम फेरीत धडक मारली. चोप्राने पहिल्याच प्रयत्नात ८२.१० मीटर फेक केली. दुस-या प्रयत्नात ८३.२१ असा थ्रो फेकला. तिस-या प्रयत्नात त्याने ८३.१३ असा थ्रो केला, चौथ्या प्रयत्नात त्याचा थ्रो ८२.३४ होता. ५ व्या प्रयत्नात नीरजने ८५.५८ मीटर फेक केली आणि **(पान ७ वर)**

## मुंबई आणि ठाण्याचे शिक्षणाधिकारी निलंबित :शिक्षण मंत्री दीपक केसरकर

मुंबई : बदलापूर अत्याचार प्रकरणाच्या पार्श्र्वभूमीवर ठाणे आणि मुंबईच्या शिक्षणाधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली. अत्याचार झाल्याच्या घटनेबाबत शिक्षण विभागाला ताबडतोब न कळवल्याबद्दल ठाण्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांना निलंबित करण्यात आले आहे. तर मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये सीसी टीव्ही कॅमेरे लावण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास दिरंगाई केल्याबद्दल शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

बदलापूर येथील एका शाळेत अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याच्या घटनेचे तीव्र पडसाद समाजात उमटलेले असताना राज्य सरकारनेही आता या प्रकरणी कठोर पावले उचलली आहेत. दीपक केसरकर यांनी शुक्रवारी पालिका मुख्यालयात आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत त्यांनी पालिकेशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. त्यात पालिका शाळेत सीसी टीव्ही लावण्याच्या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याबाबत केसरकर यांनी पालिका अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना केसरकर यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश प्रशासनाला दिल्याचे घोषित केली. त्याचबरोबर ठाण्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांचेही निलंबन करण्याचे आदेश दिल्याचे त्यांनी सांगितले.

केसरकर यावेळी म्हणाले की, बदलापूर घटनेबाबत शिक्षणाधिकारी राक्षे यांना १६ ऑगस्टलाच **(पान ७ वर)**

## ए-१, ए-२ दूध विक्रीला मनाई

मुंबई : - अन्न सुरक्षा नियामक फसई ने ई-कॉमर्ससह इतर खाद्य कंपन्यांनाही पॅकेटने ए-वन आणि ए-टू प्रकारचे दूध आणि डेअरी प्रोडक्ऐटचे दावे हटविण्याचे आदेश दिले आहेत.



एफएसएसएआय ने म्हटले आहे की, हे दावे फूड सेफ्टी अँड स्ऐटँडर्ड ॲक्ऐट, २००६ नुसार नाहीत. आता एफएसएसएआयने नुकत्याच काढलेल्या आदेशात म्हटले आहे की, त्यांनी या प्रकरणाचा तपास केला आहे. ए-वन आणि ए-टू मधील अंतर दुधातील बीटा-केसीन प्रोटीनच्या स्ऐट्रक्ऐचरशी संबंधित असल्याचे तपासात समोर आले आहे.

सध्याचे एफएसएसएआय नियम या फरकाला मान्यता देत नाहीत. फूड बिऐझिनेस ऑपरेटर्सचा उल्लेख करत एफएसएसएआय ने म्हटले आहे की, एफबीओ ला आपल्या प्रोडक्ऐटवरून अशा प्रकारचे दावे हटविण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय, ई-कॉमर्स प्ऐलॅटफॉर्मवरूनही अशा प्रकारचे दावे तत्काळ हटविण्यास सांगण्यात आले आहे. महत्वाचे म्हणजे, कंपन्यांना आधीपासूनच प्रिंट लेबल संपविण्यासाठी सहा महिन्यांचा वेळ देण्यात आला आहे. यानंतर कसल्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही.

ए-१ आणि ए-२ दुधात बीटा-केसिन प्रोटीनचे स्ट्रक्चर वेगवेगळे असते, जे गायीच्या जातीनुसार वेगवेगळे असते. या सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, असे नियामकाने म्हटले आहे.

काय आहे ए-१ आणि ए-२ प्रोटीन?

ए-१ हे एक प्रकारचे प्रोटीन आहे. हे गायीच्या दुधात आढळते. ते जेव्हा पचवले जाते तेव्हा एक अशा प्रकारचे पेप्टाइड तयार होते **(पान ७ वर)**

## पॅरासिटॉमॉलसह १५६ औषधांवर केंद्राची बंदी

नवी दिल्ली : जी औषधे दोन किंवा अधिक औधषांचे रसायन एका विशिष्ट प्रमाणात वापरून तयार केली जातात, त्यांना एफडीसी म्हटले जाते. सध्या देशामध्ये अशा औषधांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. दरम्यान, ताप, सर्दी, अॅलर्जी, अंगदुखी, डोकेदुखी यासारख्या किरकोळ आजारांवर उपचार ठरणारी १५६ एफडीसी औषधांवर बंदी घातली आहे.

आता मेडिकल स्टोअर्समधून ही औषधे विकता येणार नाहीत. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही औषधे प्रकृतीसाठी धोकादायक ठरू शकतात. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने याच महिन्याच्या १२ तारखेला प्रसिद्ध केलेल्या नोटिफिकेशननुसार सरकारने फार्मा कंपन्यांकडून वेदनाशामक औषधांच्या रूपात वापरण्यात येणा-या एसेक्लोफेनाक ५० एमजी+पॅरासिटामॉल १२५ एमजी टॅबलेटवर बंदी घालण्यात आली आहे.

याबाबत रिपोर्टनुसार सरकारने पॅरासिटामॉल, ट्रामाडोल, टारिन आणि कॅफिन यांच्या कॉम्बिनेशनवरही बंदी घातली. मल्टीव्हिटॅमिनच्या काही औषधांनाही याच्या चौकटीत आणण्यात आले आहे. एसिक्लेफेनाक ५० एमजी+पॅरासिटामॉलल १२५ टॅबलेटवरही बंदी घालण्यात आली आहे. मोठ्या फार्मा कंपन्यांकडून बनवण्यात येणा-या वेदनाशामक औषधांमधील हे प्रसिद्ध कॉम्बिनेशन आहे.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अर्जातील त्रूटींची पूर्तता, आधार लिंकला गती द्यावी : जिल्हाधिकारी





लातूर / प्रतिनिधी- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्राप्त काही अर्जामध्ये त्रुटी असल्याने, असे अर्ज ऑनलाईन स्वरुपात परत पाठविण्यात आले आहेत. या अर्जांमधील त्रुटींची पूर्तता करून अर्ज पुन्हा जिल्हास्तरीय समितीकडे पाठवावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. ज्या महिलांनी अद्याप बँक खात्यांना आधार क्रमांक संलग्न केलेला नाही, अशा महिलांनी आपले खाते असलेल्या बँकेत जावून बँक खात्यांना आधार क्रमांक जोडण्याची कार्यवाही करवी. तसेच आतापर्यंत अर्ज न केलेल्या पात्र महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगिता टकले, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता केंद्राचे सहायक संचालक बालाजी मरे, नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक प्रमोद शिंदे, महावितरणचे अधिक्षक अभियंता श्री. सांगळे यांनी यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पहिल्या टप्प्यातील पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम झाली आहे. या योजनेसाठी अद्यापही अर्ज न केलेल्या महिलांना पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र महिलेचा अर्ज भरून घेण्याची कार्यवाही करावी. एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, **(पान ७ वर)**

## पुढील दोन दिवस राज्यात मुसळधार पाऊस पडणार

मुंबई- राज्यात पुढील दोन ते तीन दिवस सर्वत्र जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, उद्या कोकणात सर्वत्र मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईसाठी उद्या ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलाआहे. त्यासोबतच ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरीसाठी देखील ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

घाट परिसरात देखील जोरदार पावसाचा इशारा

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार राज्यातील विविध भागात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुण्यातील घाट परिसरासाठी देखील ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोल्हापूर आणि साताऱ्यातील घाट **(पान ७ वर)**

## आरक्षणासह सर्व रेल्वे तिकीटा करिता लातूरात ऑनलाईन पेमेंटची सुविधा

**मध्य रेल्वे क्षेत्रिय सल्लागार समिती सदस्य चंद्रकांत कातळे**

लातूर दि.२३ - रेल्वे तिकीटाचे आरक्षण करताना अथवा इतर तिकीटे काढताना अनेक रेल्वे प्रवाशांना रोख रकमेचा व्यवहार करताना अडचणी येत असल्याचे लक्षात घेऊन लातूर रेल्वे बुकिंग केंद्रावर ऑनलाईन पेमेंट करण्याची सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे अशी माहिती मध्य रेल्वेच्या क्षेत्रीय सल्लागार समितीचे सदस्य चंद्रकांत कातळे यांनी दिली.



लातूर रेल्वे स्टेशन मार्गे धावणाऱ्या रेल्वे गाड्यात सातत्याने वाढ होत आहे आणि दिवसेंदिवस रेल्वेचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. प्रवास सुलभ व्हावा यासाठी बहुतांशी रेल्वे प्रवासी तिकिटाचे आरक्षण करतात. तात्काळ व इतर तिकिटे काढण्यासाठी आलेल्या अनेक प्रवाशांना रोख रकमेचा व्यवहार करणे अवघड होत आहे असे सांगून चंद्रकांत कातळे म्हणाले की, प्रवाशांची अडचण लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाच्या वतीने लातूर रेल्वे स्थानक, लातूर येथील जुने रेल्वे स्थानक येथील आरक्षण केंद्र यासह औसारोड, ढोकी, येडशी, उस्मानाबाद, पांगरी, बार्शी, शेंद्री या सर्व रेल्वे स्थानकावर ऑनलाईन पेमेंट करिता क्यूआर कोडची व्यवस्था करण्यात आली आहे.

सध्या सर्वत्र ऑनलाईन पेमेंटची सुविधा झाल्याने सर्वसामान्य जनतेतून ऑनलाईन व्यवहाराला मोठी पसंती दिली जात आहे. रेल्वे स्थानकावर ऑनलाइन पेमेंटची व्यवस्था नसल्याने अनेक वेळा प्रवाशांना अडचणींना तोंड द्यावे लागत होते. प्रवाशांची ही अडचण लक्षात घेऊन रेल्वे प्रवाशांना तिकिट खरेदीसाठी आता फोन पे, गुगल पे, पेटीएम, विविध बँक द्वारा पेमेंट करून तिकिट खरेदी करता येणार आहे. नव्याने सुरू केलेल्या या ऑनलाइन सुविधेमुळे रेल्वे प्रवाशांना **(पान ७ वर)**

# धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी सराला बेटाचे मठाधिपती रामगिरी महाराज यांच्या गुन्हा दाखल करावे

## चाकुर येथील मुस्लिम समाजांची पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्याकडे मागणी



मुस्लीम बांधवानी अफवेवर विश्वास ठेऊ नये शहरातील मुस्लीम समाजाने शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे.तालुक्यात किंवा शहरात कोणतही अनुचित घटना घडली तर सर्वप्रथम पोलीस ठाण्याशी संपर्क करावा.आम्ही घडलेल्या घटनेची चौकशी करून दोषी विरोधात कारवाई करण्यात येईल.तुम्ही दिलेल्या निवेदनांची माहिती आम्ही पुढील कारवाईसाठी पोलीस अधिक्षक लातुर यांना कळऊ असे निकम दत्तात्रय यांनी सांगितले.

**- दत्तात्रय निकम**
पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन चाकुर

चाकुर / प्रतिनिधी-मुस्लिम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या बाबत कीर्तनामधून आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या आरोपावरून सराला बेट येथील गंगागिरी महाराज मठाचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांच्यावर गुन्हा गुन्हा करावे अशी मागणी मुस्लीम समाजाच्या वतीने करण्यात आली.चाकुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना निवेदन देऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली.

सदरची घटना नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नर तालुक्यातील पंचाळे या गावी घडलेली असल्याकारणाने चाकुर येथील मुस्लिम समाजाने कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे.सुमारे दोनशे वर्षांची परंपरा असलेल्या रामगिरी महाराजांच्या वार्षिक सप्ताह सिन्नर तालुक्यातील पंचाळे या गावी चालू आहे. याच दरम्यान महाराजांनी वरील वक्तव्य केल्याचे सांगितले जाते. त्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांमध्ये प्रसारित झाला.काल सायंकाळी व्हॉट्सॲपवर हा व्हिडीओ बघितल्यानंतर मुस्लिम समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. वादग्रस्त वक्तव्याबाबत महंतांचा निषेध करत याबाबत गुन्हा दाखल करावा यासाठी मुस्लीम समाजाने निवेदन दिले.

मठाधिपती विरोधात धार्मिक भावना दुखावणारे वक्तव्य केल्याबाबतचा गुन्हा दाखल करावा.

निवेदनावर पप्पुभाई शेख,मौलाना मतीन गुळवे, सय्यद इलियास,मुन्ना सय्यद, मौलाना उमरफारूख शेख,पठाण मुज्जफर मौलाना, मौलाना महेताब लालुभाई, मौलाना इलाही कोतवाल, मौलाना सय्यद इसा, बाबुभाई दापकेवाले, सलीमभाई तांबोळी, शेख इलियास, पठाण रियाज,शेख साजिद, माजीद पटेल, महंमद सय्यद,वशीम शेख, शकील गुळवे,अझहर सौदागर, सोहेल हरणमारे, शेख अकबर, प्रा.डॉ.सय्यद फयाज, रहेमुतुल्ला शेख, बाबा सय्यद, मोईन गुळवे,इरफान शेख,नबी सय्यद,उमर गुळवे,बिलाल सय्यद,बिलाल शेख,मुजीब शेख,सह चाकुर शहरातील असंख्य मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# राजकीय नेता म्हणून नव्हे, तर दोन मुलींचा पिता म्हणून आधार देण्यासाठी मोर्चात सहभागी

लातूर/प्रतिनिधी : कोलकत्ता किंवा बदलापूर या ठिकाणी घडलेल्या घटना अत्यंत संतापजनक असून तळपायाची आग मस्तकापर्यंत पोहोचवणाऱ्या आहेत.या घटनेने दोन मुलींचा पिता म्हणून मी अत्यंत अस्वस्थ झालो.ज्या मुलींच्या बाबतीत अशा अमानुष घटना घडल्या तशा कोणाच्याही बाबतीत घडू नयेत. म्हणुनच विद्यार्थ्यांनी काढलेल्या मूक मोर्चात मी सहभागी झालो,असे मत भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.

अत्यंत संवेदनशील असलेल्या अशा गोष्टींमध्ये कुणीही राजकारण न करता सामूहिकरीत्या अशा प्रवृत्तींना ठेचले पाहिजे,अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. कोलकत्ता व बदलापूर येथील अत्याचाराच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि.२३) लातूर येथे दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला होता.या मुक मोर्चातील विद्यार्थिनींना आधार देण्यासाठी




मी उपस्थित राहिलो,असे कव्हेकर यांनी सांगितले. सरकार या घटनेबाबत अत्यंत गंभीर असून कडक कारवाई कारण्यासाठी जलद कायदेशीर प्रक्रिया करत आहे.दुर्दैवी घटनेबाबत चिंतन होणे गरजेचे आहे. लातूर शहर शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे शहर असून महाराष्ट्रातून मुली शिक्षणासाठी येथे येतात.काही मुली एकट्या राहतात.कोचिंगला एकट्या सायकलवर जातात. त्यांच्या मनात कुठलीही भीती राहू नये,असे वातावरण येथे आहे.अशा घटनांबाबत फक्त मुलीच नाही तर इथली मुलेही गंभीर आहेत. त्यामुळेच या मोर्चाला मुलांचीही उपस्थिती लक्षणीय असल्याचे ते म्हणाले. आपल्या भगिनीवर अन्याय होत असताना लातूरची मुलं अत्यंत संवेदनशील आहेत.

अशा घटनेचे राजकीय भांडवल न करता मूळ घटनेवर चिंतन होणे गरजेचे आहे. आजच्या पिढीचे आदर्श टिक टॉक स्टार,रील स्टार असल्याचे म्हणत त्यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.जोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले असे महापुरुष आपले आदर्श होणार नाहीत तोपर्यंत अशा घटना रोखणे कठीण आहे.अशा विकृत भावना मनात न येण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातही अध्यात्मिक स्वरूपाचे काम झाले पाहिजे,अशी भावना त्यांनी यावेळी बोलून दाखविली. अध्यात्मिक शिक्षणाने विद्यार्थ्यांची भावना निश्चितपणे बदलेल. त्यांच्यावर चांगले विचार बिंबवणे शक्य होईल असेही ते म्हणाले.

# हिंदु हुंकार मोर्चा निमित्त दिनांक २४ रोजी ९ ते १४ वाजे पर्यंत लातुर शहरातील मार्गात बदल

लातूर / प्रतिनिधी- पोलिस निरीक्षक,वाहतूक नियंत्रण शाखा, लातूर यांचे संदर्भीय पत्रान्वये, श्री देवीदास काळे जिल्हाध्यक्ष लातूर शहर भारतीय जनता पार्टी व इतर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २४/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता बांग्लादेशातील हिंदू वरील अत्याचाराच्या निषेधार्थ लातूर जिल्हा बंदचे तसेच गंजगोलाई ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यत हिंदु हुंकार मोर्चा काढणार असल्याचे कळविण्यात आले आहे. सदर मोर्चात जिल्हयातील आमदार व जनसमुदाय मोठया प्रमाणात जमा होणार आहे. त्यामुळे सदर मार्गावर दुतर्फा गर्दी होवून वाहतूक कोंडी होण्याची शकता आहे. त्यामुळे जनतेच्या सोईच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने लातूर शहरातील खालील मार्गावरील वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे आवश्यक आहे.लोकांच्या दैनंदीन कामकाजानिमीत्त व दळणवळणानिमीत्त त्यांना विविक्षीत ठिकाणी पोहचणे निकडीचे असते सदरच्या अडचणी लक्षात घेता दिनांक २४/०८/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी १४.०० वाजे पर्यंत लातूर शहरातील खालील मार्गावरील वाहतुक बंद करुन विविध भागात वळविणे आवश्यक असल्याने पर्यायी वाहतूक मार्गाबाबत आदेश निर्गमित करणेबाबत कळविण्यात आले आहे.

तरी हिंदु हुंकार मोर्चाचा मार्ग गंजगोलाई- मुख्य बसस्थानक- मिनी मार्केट- टाऊन हॉल- अशोक हॉटेल चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक असा असणार असल्यामुळे दिनांक २४/०८/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी १४.०० वाजे पर्यंत सदरचे रोड हे सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक, टॅम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) वाहतुकीसाठी बंद राहतील. ह तरी जनतेने खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा : १. पी.व्ही. आर चौकातुन शिवाजी चौक व शहरात येणारे एस.टी.बसेस पी.व्ही.आर.चौकातुन रिंगरोडने नवीन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्टॅन्डचा वापर करतील.बाकी सर्व वाहने रेणापूर नाकाकडे किंवा खाडगाव टी पॉर्इंट मार्गे वाडा हॉटेल किंवा खाडगाव टी पॉर्इंट, साई धाम, आशियाना बंगला, जुना औसा रोड याचा वापर करतील.

२. औसा रोडने शहरात येणाऐया एस.टी.बसेस वाडा हॉटेल- पी.व्ही.आर.चौक मार्गे रिंगरोडने जुना रेणापुर नाका येथिल बसडेपोचा वापर करतील. तसेच चार चाकी,तीन चाकी व दोन चाकी वाहने जुना औसा रोडवरुन आशियाना बंगला, साई धाम मार्गे खाडगाव टी पॉर्इंट किंवा नाईक चौक मार्गे सुतमील रोड या मार्गाचा वापर करतील.

३. अंबाजोगाई रोडने लातूर शहरात येणाऐया एस.टी.बसेस जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचाच वापर करतील. अंबाजोगाई रोडने येणारी चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्वर मंदिराकडील रोड मार्गे गरुड चौकाकडे किंवा गाव भागात जातील व तसेच जुना रेणापुर नाका येथून बालाजी मंदीर या मार्गाचा वापर करतील.

४. नांदेड रोडने शहरात येणाऐया एस.टी.बसेस या गरुड चौक .सिद्धेश्वर चौक,नविन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचा वापर करतील. नांदेड रोडने येणारे ट्रक, चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्वर मंदिराकडील रोड मार्गे नविन रेणापूर नाका, रेल्वे स्टेशन मार्गे पीव्हिआर चौक या मार्गाचा वापर करतील किंवा गरुड चौक, बाभळगाव नाका, बश्वेश्वर चौक मार्गे राजीव गांधी चौक या मार्गाचा वापर करतील.

५. शहरातील वाहतुकीसाठी जनतेस १)राजस्थान विद्यालय ते पॅरलल रोडने बेद्रे कॉम्पलेक्सच्या पाठीमागून औसा रोड, आशियाना बंगला - खाडगाव रोड ते रिंगरोडचा २)गांधी मार्केट ते बस्वेश्वर महाविद्यालय - रमा टॉकी खोरी गल्ली शिवनेरी लॉज या मार्गाचाच अवलंब करावा. जुना रेणापुर नाका बसस्थानक येथे येणाएऐया व जाणाऐया सर्व बसेस परत त्याच मार्गे रिंग रोडने जातील. तरी सर्व नागरीकांनी दिनांक २४/०८/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते १४.०० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळावा व पर्यायी मार्गाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे.

# लातूर मनपात दोन सहाय्यक आयुक्त रुजू

लातूर/प्रतिनिधी: लातूर महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्तांच्या रिक्त जागांवर दोन अधिकारी शुक्रवारी (दि.२३ ) रुजू झाले आहेत.दोघांनीही पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले.

लातूर महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्तांची सात पदे मंजूर आहेत परंतु त्यापैकी सहा पदे रिक्त होती.या रिक्त पदांवर शासनाकडून दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती शुक्रवारी करण्यात आली. अजित गणपत





ढोपे व निर्मला नेताजी माने हे दोघे शुक्रवारी रुजू झाले. मुख्याधिकारी संवर्गातील गट ब मधून या दोघांची नियुक्ती झालेली आहे.

विशेष म्हणजे दोघांचीही ही प्रथम नियुक्ती आहे. सहाय्यक आयुक्तांच्या रिक्त जागांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यामुळे आता मनपाचे कामकाज अधिक गतिमान होणार आहे. पदभार स्वीकारल्यानंतर दोन्ही अधिकाऱ्यांचे मनपातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

# बदलापूरच्या नराधमाला तात्काळ फाशी द्या:स्वामी

धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) - बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा शिवा संघटनेचे पदाधिकारी सातलिंग स्वामींनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, उमरगा लोहारा विधानसभा क्षेत्रातील सर्व खाजगी, जि.प. शाळा आणि संस्थेच्या शाळातील कर्मचाऱ्यांची पार्शभूमी, शाळेला मुलींना घेऊन जाणाऱ्या वाहनचालकांची पार्शभूमी तथा वाहनाचे पेपर आणि शाळेत मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित स्वच्छतागृह आहेत का ? याची तपासणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. तसेच त्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला जलदगती न्यायालयात सदर केस चालवून तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी. यासाठी शासनाने विशेष पुढाकार घ्यावा. त्यामुळे भविष्यात असे कृत्य कोणीही करणार नाही, आपल्या या निर्णयाचे देशातील सर्व नागरिक प्रतीक्षा करत आहेत. शाळेतील गुन्हेगारी पार्शभूमी असलेल्यांना काढून टाकण्यात यावे. तसेच शाळेला शालेय मुलींना घेऊन जाणाऱ्या शाळेच्या व खाजगी वाहनांच्या पेपर आणि वाहन चालक व्यसनाधीन तथा गुन्हेगारी पार्शभूमीवर वाहन चालक परवाने रद्द करण्यात यावेत. विशेष म्हणजे सर्व शाळेत मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित स्वछतागृह आहेत का ? नसतील तर तात्काळ बांधून घेण्याबाबत आदेश करावे. अन्यथा त्या संबंधित शाळेवर कारवाई व्हावी अशी मागणी स्वामी यांनी केली आहे.

# पुण्यात सराईत गुंडाचा निर्घृणपणे खून

पुणे : विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात मागील काही दिवसांपासून अनेक गुन्हे घडताना दिसत आहे, खून, हत्या, महिलांवर होणारे अत्याचार या घटनांनी राज्य हादरले आहे, नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. अशातच पुण्यातून आणखी एक खूनाची घटना समोर आली आहे.

पुण्यात काल (गुरूवारी) मध्यरात्रीच्या सुमारास सिंहगड रस्त्यावर एका सराईत गुंडाचा निर्घृणपणे खून करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सिंहगड रस्त्यावरील एका बारमध्ये दारू पिण्यासाठी बसल्यानंतर वाद झाला आणि त्या वादातूनच मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास हा धक्कादायक प्रकार घडला आहे. हनुमंत उर्फ गोट्या शेजवळ असे खून झालेल्या गुंडाचं नाव आहे. तर याप्रकरणी आरोपी गणेश आकाश कुलकर्णी याला सिंहगड रोड पोलीसांनी ताब्यात घेतलं आहे.

सिंहगड रोडवरील वडगाव ब्रिज परिसरात क्लासिक बार नावाचे हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये गुरुवारी रात्री गोट्या शेजवळ दारू पिण्यासाठी बसला होता. यावेळी आरोपी आकाश कुलकर्णी हा देखील त्या ठिकाणी होता. हॉटेलमध्ये किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वादावादी झाली. यानंतर आरोपी आकाश कुलकर्णी हा हॉटेलमधून बाहेर पडला. त्यावेळी गोट्या शेजवळ याने आकाश कुलकर्णी याचा पाठलाग सुरू केला. आकाश कुलकर्णीला शेजवळ त्रास देऊ लागला. त्यानंतर दोघेही सिंहगड रस्ता परिसरातीलच सुवर्ण हॉटेल जवळ पोहोचले. या ठिकाणी पुन्हा त्यांच्यात वाद झाला.

पुन्हा गोट्या शेजवळ आकाश कुलकर्णीला त्रास देऊ लागला. त्यानंतर संतापलेल्या आकाश कुलकर्णीने रस्त्याच्या जवळच असणा-या एका पंक्चरच्या दुकानातील हातोडा घेतला आणि गोट्या शेजवळच्या डोक्यात घातला. वर्मी घाव बसल्याने गोट्या शेजवळ रक्ताच्या थारोळ्यात कोसळला यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान घटनेची माहिती मिळताच सिंहगड पोलिस घटनास्थळी दाखल झाले. आरोपी आकाश कुलकर्णी याला ताब्यात घेतले. रात्री उशिरापर्यंत सिंहगड रोड पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

वाढदिवसाच्या दिवशी आरोपीचा गेम स्वत:च्या वाढदिवसाचे सामान घेऊन जाताना बारामती तालुक्यातील जळोचीमध्ये जुन्या भांडणाच्या वादातून टोळक्याने काल(बुधवारी) रात्री गणेश धुळाबापु वाघमोडे (१७) या अल्पवयीन गुन्हेगार मुलाचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

खून झालेल्या गणेश वाघमोडे याने शाळेसमोरच शशिकांत कारंडे यांचा खून केला होता. त्यानंतर आता जवळपास दोन वर्षांनी गणेश वाघमोडेची अज्ञातांनी धारदार शस्त्रांनी वार करत खून केल्याची घटना समोर आली आहे. काल(बुधवारी) रात्री बारामती शहरातल्या जळोची येथील काळा ओढा याठिकाणी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. दोन वर्षांपूर्वी गणेश वाघमोडे याने शशिकांत कारंडे यांचा खून केला होता. त्यानंतर बरोबर दोन वर्षांनीच गणेशचा खून करण्यात आला आहे. याबाबत फिर्यादी नवनाथ उत्तम चोरमले (३९), यांनी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार, उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित

लातूर दि. २३ : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयाकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार देण्यात येतो. तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामागृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कारासाठी २५ सप्टेंबरपर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख रुपये, ७५ हजार रुपये, रुपये ५० हजार रुपये, रुपये २५ हजार रुपये सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र , ग्रंथभेट आणि रोख रक्कम देवून गौरविण्यात येते. राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसेच राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येकी २५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, ग्रंथभेट आणि रोख रक्कम देवून गौरविण्यात येते. सन २०२३-२०२४ या वर्षीच्या पुरस्कारासाठी इच्छूक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह २५ सप्टेंबर, २०२४ पर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्र. ग्रंथालय संचालक अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.

# लैंगिक अत्याचार, बलात्कार सारख्या मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी बंद

**लातूर / प्रतिनिधी-** बदलापूर येथील मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटनेमुळे जनतेत असंतोष असून आदर्श विद्यामंदिर या शाळेत दोन विद्यार्थ्यांनीवर लैंगिक अत्याचार केला जातो आणि ही घटना लपविण्याचा प्रयत्न शाळा प्रशासन आणि राजकीय पक्षाकडून केला जात असल्यामुळे त्याचे तीव्र पडसाद बदलापूर शहरात पडले.या घटनेतील आरोपीस तात्काळ अटक करून गुन्ह्याचा छडा लावण्याऐवजी या घटनेच्या निषेधार्थ बदलापूर रेल्वे स्टेशनवर झालेल्या आंदोलनातील आंदोलकांना अटक करण्यात महाराष्ट्र शासनाचा कसला आहे पुरुषार्थ. आणि सदर घेटनेपासून लक्ष विचलित करण्याचा प्रकार हे न समजणारे कोडे आहे,निकोप पत्रकारास जसा कांही बलात्कार तुझ्यावरच झाला आहेअशा पद्धतीची टिप्पणी करणाऱ्याला शासन पाठीशी घालत आहे.

राज्य पातळीवर नव्हे तर देश पातळीवर महिला अत्याचारात दिवसेंदिवस वाढच होत आहे.पश्चिम बंगाल येथील घटना ज्या नराधमाने केली त्यास फाशी शिवाय दुसरा पर्याय नाही. बदलापूर घटनेतील लोक भावनेचा आदर करण्याऐवजी उज्वल निकम यांच्यासारख्या भाजप प्रवक्त्याला सरकारी वकील म्हणून नेमण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. शाळा प्रशासन हे सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्याचे असून अशा परिस्थितीत शासनाच्या निर्णयामुळे निश्चितपणे शंकेस वाव निर्माण होतो.

बदलापूर येथिल लैंगिक अत्याचार तसेच देश पातळीवरील सर्व महिला अत्याचाराच्या विरोधात आवाज बुलंद करण्यासाठी महाराष्ट्र महाविकास आघाडीकडून दि.२४ ऑगस्ट शनिवार रोजी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आलेला आहे. गुन्हेगार हा कोणत्या एका जातीचा ,धर्माचा याचा विचार न करता मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटनेतील गुन्हेगाराची प्रकरणे जलद गतीने चालवून गुन्हेगारास कठोर शासन झालेच पाहिजे. यासाठी पुकारलेल्या या महाराष्ट्र बंद मध्ये लातुर जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवाव्यात,सर्व व्यावसायिकानी आपापले व्यवहार बंद ठेवून घटनेचा निषेध नोंदवावा असे आवाहन महाविकास आघाडीचे घटक पक्ष भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार),शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे),शेतकरी कामगार पक्ष,मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पार्टी व इतर सर्व घटक पक्षाच्या वतिने करण्यात आले आहे.

# आजोबआजी हेच मुळ संस्कारपीठ :ह.भ.प.श्री.ज्ञानराज महाराज

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा : प्रतिनिधी- आपल्या घरात असणारे आजोबा आजी वडीलधारी माणसं आणि आई वडील हेच मुळातील संस्कार पीठ आहेत ते जे सांगतील ते हिताचे आणि उत्कर्षाचेच असते त्यामुळे प्रत्येक लहान मुलांनी तरुणांनी आजोबा आजी आई- वडिलांचे आज्ञेचे पालन करावे आणि त्यांना विनम्र नमस्कार करून घराबाहेर पडावे असा सल्ला ह भ प श्री ज्ञानराज महाराज यांनी दिला आहे मातृदेवोभव, पितृदेवोभव, गुरुदेव भव, असा महिमा संत शास्त्रांनी सांगितल्याचे महाराज म्हणाले.



औसा येथील नाथ मंदिरात पिठाधिपती सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या श्रावण मास तपोअनुष्ठानात नाथ मंदिरातील नित्य प्रासादिक चक्रीभजन सेवेनंतर ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी वरील प्रवचनात महाराज बोलत होते. सेवेकरिता १८ व्या अध्यायातील ९ स्लोकातील ५,६,७ या ओव्यांवर चिंतन करताना ते उपस्थित भाविक श्रृत्यांशी संवाद करीत होते.

मोहत्यागला की मनमोहन भेटतो म्हणजेच लालसा इर्षा द्वेष वासना मीपणा अहंकार याचा त्याग केल्याशिवाय विनम्रता अंगी धारण करून विश्वासनिष्ठा ठेवल्याशिवाय आणि नित्यनेमात सदाचरणात दिनचर्या आणल्याशिवाय साधनेचे सूत्र सापडणार नाही आणि त्याशिवाय संत कृपा भगवंत कृपा होणार नाही असे महाराज म्हणतात आपल्या वाट्याला आलेली जी काही कर्मे आहेत ती प्रामाणिकपणे परिश्रमाने आणि निष्ठेने परिपूर्ण करायला हवी कर्माशिवाय जीवनात काहीही साध्य होणार नाही जे कर्म सत्कर्म आहे व जे मी करतो याच्या अहंकारा शिवाय आहे तेच कर्म समर्पण भावनेतून भगवंताच्या चरणी रुजू होते आणि आपण कृपेस पात्र ठरतो असे महाराज म्हणाले. आज-काल आई-वडिलांच्या आजोबा आजींच्या सानिध्यात न गेल्यामुळे किंवा दूर राहण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याने मूळ जे जीवनाचे कल्याण करणारे संस्कार आहेत यापासून नवी पिढी ही दुरावली जात आहे याबाबत महाराजांनी चिंता व्यक्त केली व त्यावर त्यांच्या सहवासात राहून ते जे सांगतील त्याकडे गांभीर्याने स्वहितासाठी वाहून त्यावर वागणे ही प्रत्येक जीवाची प्रार्थमिक साधनाच होय हे स्पष्ट केले श्रावण मासातील आजची संकष्ट चतुर्थी हा गणेशाच्या उपासनेचा पर्वकाळ असून प्रत्येक मनुष्याने वर्षभर जास्त शक्य झाले नाही त्यांनी संकष्ट चतुर्थी व्रत करून विद्येचा अधिपती श्री गणपती यांचा कृपा आशीर्वाद मिळवावा व आपली बुद्धी सद्बुद्धीत रूपांतरित व्हावी यासाठी गणेशास प्रार्थना करावी असे महाराज म्हणाले. श्री राजकुमार दशरथ क्षीरसागर आणि शहाजी अंबाजी थोरात यांनी आपली माळ सेवा गुरुचरणी रुजू केली.

यशवंत
धाराशिव जिल्हा
शनिवार दि. २४ ऑगस्ट २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


# ईव्हीएम- व्हीव्हीपॅट मशीन्सच्या तपासणीसाठी राजकीय प्रतिनिधींनी उपस्थित रहावे - डॉ ओंबासे

धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) – आगामी काळात होणाऱ्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हय़ात ईव्हीएम– व्हीव्हीपॅट मशीनची प्रथमस्तरीय तपासणी सुरु आहे. या तपासणीवेळी जिल्हयातील राजकीय प्रतिनिधींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले आहे.

जिल्ह्यात १ ऑगस्टपासून ईव्हीएम–व्हीव्हीपॅट मशीन्सची प्रथमस्तरीय तपासणी सुरु करण्याच्या निवडणूक आयोगाच्या सुचनेनूसार काम सुरु आहे. त्या अनुषंगाने धाराशिव तालुक्यातील पिंपरी येथील शासकीय गोदामात ईव्हीएम– व्हीव्हीपॅट मशीन्सची प्रथमस्तरीय तपासणी सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्ष तसेच त्यांचे प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याबाबतचे निर्देश आहेत. त्यानुसार राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी सकाळी १० वाजता उपस्थित राहून ईव्हीएम – व्हीव्हीपॅट मशीनविषयी माहिती जाणून घ्यावी. तसेच काही प्रश्न वा शंका असल्यास त्याचे निराकरण भारत इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचे अभियंते



यांच्याकडून करुन घ्यावेत, असे आवाहन डॉ ओंबासे यांनी केले आहे.

# पुढच्या महिन्यापासून धाराशिव-तुळजापूर रेल्वेचे काम सुरु होणार - आ. पाटील



धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) – सोलापूर – तुळजापूर – धाराशिव रेल्वे मार्गाच्या एकुण ११० किमी लांबीपैकी धाराशिव ते तुळजापूर या ४१.४ किमी लांबीच्या रेल्वे लाईनच्या कामाची ४८७ कोटीं रुपयांची निविदा अंतिम झाली आहे. तर कंत्राटदाराला नियुक्ती आदेश देऊन दि.१ सप्टेंबरपासून काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीमध्ये आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी संबंधित कंत्राटदार व रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

आ. पाटील यांच्या विनंतीवरून जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाचा आढावा घेण्यासाठी रेल्वे विभागाचे अधिकारी व संबंधित कंत्राटदाराची बैठक बोलाविली होती. सोलापूर–धाराशिव रेल्वेमार्गाच्या कामाचा कालावधी ५ वर्षावरून अडीच वर्षे करण्यासाठी या कामाचे तीन भाग करण्यात आले आहेत. पहिल्या भागाची निविदा अंतिम झाली असून दुसऱ्या भागाच्या निविदेची छाननी प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून कार्यारंभ आदेश देण्याच्या सूचना देखील या बैठकीमध्ये रेल्वे अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. रेल्वेमार्गाचे काम विहीत कालावधीत पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित करून त्याचा बार चार्ट सादर करण्याच्या सूचना कंत्राटदाराला दिल्या आहेत. तर सुरुवातीचे ३ महिने दर १५ दिवसाला या कामाचा आढावा घेण्यात येणार असून त्यानंतर दरमहा कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे. वन विभाग व एमआयडीसीच्या जाग्याबाबतच्या अडचणी सोडविण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्याशी चर्चा करून आवश्यक ते निर्देश दिले आहेत. रेल्वे विभागाच्या अधिकारी व कंत्राटदारांनी रेल्वे मार्गाच्या जागेची पाहणी केली असून जवळपास ९५ टक्के जमीनीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्णत्वास येत आहे. तसेच या रेल्वे मार्गामुळे धाराशिव येथे जंक्शन होणार असून आई तुळजाभवानीचे तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेने जोडले जाणार आहे. त्यामुळे या भागातील पर्यटनाला नवी दिशा मिळणार असून रोजगार निर्मिती व अर्थकारणाला मोठी चालना मिळणार आहे. या बैठकीस प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी शिरीष यादव, उपविभागीय अधिकारी संजय ढवळे, तहसिलदार मृनाल जाधव, रेल्वे विभागाचे उपमुख्य अभियंता बनसोडे, सहाय्यक कार्यकारी अभियंता मस्के, अभियंता नुर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# शैक्षणिक क्षेत्रातील दूरदृष्टी आजच्या तरुणांनी अभ्यासली पाहिजे - डॉ. घोडके

मुरुम दि.२३ (प्रतिनिधी) – मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीतून सुरु झालेले विद्यापीठाचे कामकाज, भौतिक सेवा सुविधा, उच्च शिक्षणातील प्रगती, स्वतंत्र उपकेंद्राची स्थापना, विविध शाखांचा विस्तार आणि विद्यापीठाचा वाढता आलेख पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा आंबेडकर विद्यापीठास जे नाव देण्यात आले त्याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो. त्या नंतरच्या काळातील मिलिंद महाविद्यालयातील नवशिक्षित तरुणांनी सुरु केलेला १९७६ मध्ये तीव्र झालेला नामांतराचा लढा ते १९९४ चे नामविस्तार आणि आतापर्यंतच्या विद्यापीठाची वाटचाल या सर्व ऐतिहासिक घडामोडींचा आढावा त्यांनी मांडला. डॉ. आंबेडकरांची शैक्षणिक क्षेत्रातील दूरदृष्टी आजच्या तरुणांनी अभ्यासली पाहिजे असे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सायबण्णा घोडके यांनी दि.२३ ऑगस्ट रोजी केले.

मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापन दिन व्याख्याते म्हणून ते बोलत होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व कै. माधवराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात




आले. विद्यापीठ ध्वज फडकावून विद्यापीठ गीत गाऊन, विद्यापीठ वर्धापन दिन चिरायू होवो ! अशा घोषणा देवून वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रतापसिंग राजपूत, डॉ. शिला स्वामी, प्रा. अशोक बावगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक बावगे यांनी तर आभार प्रा. डॉ. शिला स्वामी यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आजच्या बंदमध्ये सर्व संवेदनशील नागरिकांनी सहभागी व्हावे - आ. पाटील

धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) – बदलापूर येथील बालिकेवर झालेल्या अत्याचार प्रकरणी राज्यातील निक्कमी, असंवेदनशील व निर्ढावलेल्या महायुती सरकारला जाग आणण्यासाठी उद्या दि.२४ ऑगस्ट रोजी महाविकास आघाडीच्यावतीने पुकारण्यात आलेल्या बंदमध्ये सर्व पक्ष्यांमधील संवेदनशील मुली, महिला व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन आ कैलास पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड धीरज पाटील व राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दि.२३ ऑगस्ट रोजी केले.

धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ गुरव, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, धाराशिव तालुकाध्यक्ष विनोद वीर आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले की, बदलापूर प्रकरणी राज्यातील महायुती सरकार पूर्णतः अपयशी ठरलेले आहे. आपल्या लेकी, आई, बहिणीसाठी व त्या निर्ढावलेल्या सरकारला ताळ्यावर आणण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे या बंदमध्ये सहभागी होऊन सत्तेची मस्ती चढलेल्या सरकारला जागे करणे आवश्यक आहे. तसेच या बंदमध्ये सहभागी होऊन



व्यापारी व नागरिकांनी सरकारला धडा शिकविला तर हे सरकार निश्चित जागेवर येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर ॲड धीरज पाटील म्हणाले की, बदलापूर प्रकरणी राज्य सरकार अपयशी ठरले असल्यामुळे व्यापारी, नागरिक व सर्व शैक्षणिक संस्थांनी बंद पाळून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच संजय पाटील दुधगावकर म्हणाले की, राज्यातील लहान मुलींपासून युवती, महिला असुरक्षित आहेत, हे मागील १०–१२ दिवसांपासून सर्वांनी बघितलेले आहे. त्यामुळे संवेदना असलेल्या नागरिक, व्यापारी व महिला यांनी कोणताही पक्ष मध्ये न आणता व या निक्कमी, असंवेदनशील व निर्ढावलेल्या सरकारला धडा शिकवण्यासाठी तसेच वठणीवर आणण्यासाठी या बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

# उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कारासाठी अर्ज पाठवावेत

धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतो.

शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क व ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख रुपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये, २५ हजार रुपये आणि सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, ग्रंथभेट आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात येते.

राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता आणि उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रुपये, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र,ग्रंथभेट आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात येते. २०२३–२४ या वर्षीच्या पुरस्कारासाठी इच्छूक असणाऱ्या ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह २६ ऑगस्ट ते २५ सप्टेंबरपर्यंत ३ प्रतीत आपल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य, मुंबईचे ग्रंथालय संचालनालयाचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले.

# निम्न तेरणा उपसा प्रकरणी विरोधकांकडून श्रेयाचा केविलवाणा प्रयत्न

धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) – निम्न तेरणा उपसा सिंचन योजना दुरुस्तीच्या ११३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक सल्लागार समीतीची मान्यता प्राप्त झाली आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातुन या कामाचा सातत्याने पाठपुरावा सुरु असून लवकरच यास मंजुरी मिळणार असल्याने नेहमी प्रमाणे निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांकडून श्रेयवादासाठी केविलवाणा प्रयत्न केला जात आहे. तेरणा संघर्ष समीतीच्या नावाने दि.२२ ऑगस्ट रोजी घेतलेल्या पत्रकार परीषदेमध्ये सर्व महाविकास आघाडीशी संबंधितच सामील होते, असा आरोप भारतीय जनता पार्टीचे जिल्हा समन्वयक नेताजी पाटील व भाजप किसान मोर्चाचे रामदास कोळगे यांनी एका प्रसिद्धी पत्रकारन्वये दि.२३ ऑगस्ट रोजी केला आहे.

दिलेल्या पत्रात असे नमूद करण्यात आले आहे की, राज्यात २०१९ पासून जून २०२२ पर्यंत महाविकास आघाडीचे सरकार होते. ठाकरे सरकारच्या या अडीच वर्षाहुन अधिकच्या काळात या योजनेच्या दुरुस्तीचे साधे अंदाजपत्रक देखील तयार झाले नाही. त्यांचे सरकार असताना तेव्हा काहीच केले नाही. केवळ राजकीय द्वेषा पोटी विरोधकांकडून योजना मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असल्याने श्रेय घेण्यासाठी कांगावा केला जात आहे. या उलट भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून यासाठी प्रयत्न करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. तसेच या योजनेच्या दुरुस्तीचे काम अतिशय किचकट होते. स्थापत्य, यांत्रीक व विद्युत या ३ वेगवेगळ्या विभागांकडून संपूर्ण योजनेची पाहणी करून दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करण्यात आली. या विभागाकडून ती अंतीम करुन त्रुटी पूर्ततेसह छत्रपती संभाजीनगर येथील गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्याकडे पाठविण्यात आली. तद्नंतर राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती, नाशिक यांच्या मान्यतेने प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आलेला आहे. लवकरच यास मान्यता मिळणे अपेक्षित आहे. तर ही योजना नवीन प्रकल्प नसून अस्तित्वातील योजनेची दुरुस्ती आहे. यासाठी केवळ एक दोन कोटी नव्हे तर ११३ कोटी रुपये लागणार आहेत. अनेक अडचणींवर मात करत अतिशय किचकट असणारे काम आ. पाटील यांच्या माध्यमातून मार्गी लागत आहे. एवढ्या मोठ्या दुरुस्तीचे काम आजवर राज्यात झालेले नाही. ती पत्रकार परिषद घेणारे सर्वजण महाविकास आघाडीचे कार्यकर्ते होते. त्यांना जर खरंच शेतकऱ्यांप्रती आस्था असती तर त्यांनी या कामाच्या प्रगतीची माहिती घेतली असती, अडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेतला असता. मात्र काहीच न करता केवळ प्रसिद्धी व श्रेय मिळविण्याच्या अनुषंगाने पत्रकार परिषद घेतली आहे. काम अंतिम टप्प्यात आले की नौटंकी करण्याची विरोधकांची जुनीच शैली आहे. त्याचा प्रत्यय अनेकदा धारशिवकरांनी घेतला आहे. संघर्ष समितीच्या नावाखाली काहीजणांकडून केली जात असलेली खाटाटोप केवळ राजकीय द्वेषाने प्रेरीत कृती असल्याची टीका देखील केली आहे.

# पोलिओचा संशयित आढळल्यास नागरीकांनी घाबरुन जाऊ नये

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – तालुक्यात भिकार सारोळा येथे पोलिओचा संशयित आढळला अशाप्रकारचे वृत्त काही वृत्तपत्रात प्रकाशित झाले आहे. खरच आता पोलिओचा आजार पुन्हा आला की काय अशी भीती सर्वसामान्यामध्ये

आहे. २०११ नंतर भारतात पोलिओ वाईल्ड विषाणूचा एकही रुग्ण आढळलेला नाही. हे साध्य करण्यामध्ये पोलिओचे लसीकरण व पोलिओ संशयित बाबतचे सर्वे क्षण या दोन महत्वाच्या बाबीची प्रमुख भूमिका आहे. सर्वे क्षण व लसीकरण हा नियमित कार्यक्रमाचा भाग असून तो पोलिओ व्यतिरिक्त गोवर, रुबेला, घटसर्प, डांग्याखोकला व नवजात शिशुमधील धनुर्वात या आजारासाठी देखील

कोणत्याही कारणामुळे अचानक लुळेपणा आला असल्यास त्यास Acute Flaccid Paralysis असे संभोधले जाते व अशा रुग्णाच्या शौचाचा नमुना प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविला जातो. असे रुग्ण शासकीय व खाजगी आरोग्य यंत्रनेमार्फत शोधणे व त्याचा तपास करणे हा नियमित सर्वेक्षणाचाच भाग असून असे रुग्ण दरवर्षी आढळत असतात. चालू वर्षी देखील जुलै अखेर असे १३ रुग्ण आढळून आले

आहे. असे संशयित शोधणे हा त्या सर्वेक्षणाचा नियमित भाग असल्याने नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाविरुद्ध आज बंदची हाक

**जाहीरनामा**

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**तुळजापूर येथील मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, यांचे कोर्टात.**

कि.अ.नं. २५०/२०२४ नि.नं.

ज्यापेक्षा कै. हरिदास बळीराम कदम, रा. ढेकरी, ता. तुळजापूर, हे दि. ०८/०५/२०२४ रोजी यशोधरा सुपर मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल, सोलापूर येथे मयत झाले आहेत, त्यांचे पश्चात अर्जदार नं. (१) गौराबाई हरिदास कदम, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. ढेकरी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, (२) समाधान हरिदास कदम, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. सदरप्रमाणे, (३) प्रज्ञाशिल हरिदास कदम, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदरप्रमाणे, (४) विदवान हरिदास कदम, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. सदरप्रमाणे, (५) प्रतिक्षा हरिदास कदम, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. सदरप्रमाणे, (६) प्रतिक हरिदास कदम, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. सदरप्रमाणे, हे मयताचे वारस असून, अर्जदार यांनी वारसांचे प्रमाणपत्र मिळण्यांसाठी अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार नं. १ ते ६ हे सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास कळविण्यांचे असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्यांचे आंत त्यांनी हया न्यायालयात हजर होवून, आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यांत येते की, सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना कै. हरिदास बळीराम कदम, रा. ढेकरी, ता. तुळजापूर, यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यांत येईल.

**पु.ने.ता. २६/९ /२०२४.**
**आज दिनांक : २३/०८/२०२४.**

**स्वाक्षरित/-** **वरिष्ठ लिपीक,** दिवाणी न्यायालय, तुळजापूर (आदेशावरुन)

**शिक्का**

**स्वाक्षरित/-** **सहाय्यक अधिक्षक,** दिवाणी न्यायालय, तुळजापूर (आदेशावरुन)

# सभासदांचा विश्वास हाच पतसंस्थेचा आधारस्तंभ - आ. चौगुले

## श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

मुरुम दि.२३ (प्रतिनिधी) – जोपर्यंत पतसंस्थेवर सभासदांचा विश्वास असतो तोपर्यंत पतसंस्थेची प्रगती कायम होत राहते. ही पतसंस्था गुणात्मक, ज्ञानात्मक व दर्जात्मक बनत असल्याचे समाधान व्यक्त केले. संस्थेची विश्वासार्हता अधिक वाढण्याकरिता पतसंस्थेच्या व्यवहारात पारदर्शकता आणणे गरजेचे असते. सभासदांचा विश्वास हाच पतसंस्थेचा आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन आ. ज्ञानराज चौगुले यांनी दि.२३ ऑगस्ट रोजी केले.

मुरुम येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची सन २०२३–२४ ची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रत्नमाला मंगल कार्यालयात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे व्याख्याते मोहन जाधव, माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे, शिवसेना तालुकाप्रमुख बळीमामा सुरवसे, शेखर पाटील, व्यंकट पाटील, किसन खंडागळे, भीमराव वरनाळे, प्रा. डॉ. महेश मोटे, सुरेश मंगरुळे, राजेंद्र शिंदे, संस्थेचे उपाध्यक्ष शरणप्पा मुदकण्णा, सचिव कमलाकर जाधव आदींची उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना आ. चौगुले यांनी संस्थेच्या वाटचालीमध्ये संचालक व सभासद यांचे विश्वासाचे नातेसंबंध असून केवळ सभासदांच्या सहकार्यामुळेच या पतसंस्थेला पुरस्काराने सन्मानित केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या सभेचे प्रास्ताविक व अहवाल वाचन करताना वरनाळे म्हणाले की, या पतसंस्थेला उत्कृष्ट संस्था चालविल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनकडून विभागीय पातळीवर सलग ५ व्या वर्षी देखील नुकतेच पुरस्कारांने सन्मानित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. तर मोहन जाधव यांनी बँक व्यवस्थापन आणि सभासद या विषयावर मार्गदर्शन करताना पतसंस्था नियमावली व कार्यपद्धती विषयक माहिती दिली. यावेळी दत्तात्रय इंगळे,



योगेश गुरव, शुभम वरनाळे आदींनी मनोगत व्यक्त केले. या पतसंस्थेचे संचालक अमृत वरनाळे, श्रीशैल बिराजदार, आनंदराव बिराजदार, बाबासाहेब पाटील, शिवराज समन, गुंडेराव गुरव, पतसंस्थेचे शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, चिदानंद स्वामी, प्रशांत काशेट्टी, संतोष मुदकण्णा, सचिन कंटेकुरे, महांतय्या स्वामी आदींसह कर्मचारीवृंद व सभासद आदींनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन मोहन जाधव तर आभार अशोक जाधव यांनी मानले. यावेळी परिसरातील विविध गावातून बहुसंख्येने सभासद नागरिक उपस्थित होते.

# संपादकीय

## 'व्यवस्था' जास्त दोषी

महिला डॉक्टरांनाही रात्रपाळी करावी लागते; मात्र त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार? निर्घृण कृत्य करण्यास गुन्हेगार धजावतात कसे? हे प्रश्न जास्त महत्त्वाचे ठरत आहेत. कोलकात्यातील वैद्यकीय महाविद्यालयात एका महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि तिची हत्या या गुन्ह्याचा तपास केंद्रीय गुप्तचर विभागाकडे (सीबीआय) सोपवण्याचा आदेश कोलकाता उच्च न्यायालयाने दिला आहे. राज्याच्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास योग्य रीतीने केला नाही, यावर हे शिक्कामोर्तब आहे. या हत्येबद्दल देशभर संताप व्यक्त होत आहे, तो योग्यही आहे. देशात कोठेही तरुणी, महिला सुरक्षित नाहीत ही जाणीव कोणालाही संतप्त करणारी आहे. आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयात ही भीषण घटना घडल्यानंतर ज्या घटना घडल्या त्या अधिक चिंताजनक व संतापजनक आहेत. या निर्घृण गुन्ह्यासाठी काहींना अटक झाली असली तरी अनेक प्रश्नांची उत्तरे पोलिसांनी दिली नाहीत किंवा त्यांना सापडलेली नाहीत. खुनाचा गुन्हा उघड झाल्यानंतर जनक्षोभ उसळल्यावर त्या वैद्यकीय महाविद्यालयाचा प्राचार्य संदीप घोष याने राजीनामा दिला; पण केवळ चोवीस तासांच्या आत त्याची नियुक्ती दुसऱ्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी केली गेली. त्या व्यक्तीचा या प्रकरणात काहीच दोष नाही असा याचा अर्थ होतो. गुन्ह्याची तक्रार दाखल करण्यासाठी घोष याने पुढाकार घेतला नव्हता; पण पोलिस का ढिले राहिले?

प्रश्नांचा गुंता-संबंधित महिला डॉक्टरने आपल्या सहकाऱ्यांसह रात्रीचे भोजन केले व उशीरा दोन वाजण्याच्या सुमारास विश्रांती घेण्यास गेली. रुग्णालयात विश्रांती घेण्यास योग्य जागा नसल्याने सेमिनार हॉल'मध्ये ती गेली. सकाळी तिचा मृतदेह आढळला. तरीही रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने तिच्या पालकांना तसे लगेच कळवले नाही. मृतदेहाची अवस्था बघता तिचा छळ करून मग तिच्यावर बलात्कार झाल्याचे स्पष्ट दिसत होते, तरी पोलिसांनी केवळ अनैसर्गिक मृत्यु' अशी तक्रार नोंदवून घेतली. संदीप घोष या संस्थेचा प्रमुख असूनही त्याने वा अन्य डॉक्टरांनी लेखी तक्रार का केली नाही? घोष याने त्या महिला डॉक्टरवर दोष ढकलण्याचा निर्लज्जपणा केल्याचे उघड झाल्याने तिचे सहकारी व कोलकात्यातील अन्य डॉक्टर संतापले. तिच्यावर सामूहिक बलात्कार झाला असावा हे सिद्ध होईल एवढ्या बाबी शव विच्छेदनानंतर उघड होऊनही पोलिसांच्या तपासास गती आली नाही. संस्थेतील कर्मचारी व डॉक्टरांचे असहकाराचे धोरण व पोलिस तपासातील दोष लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला, ही खरे तर राज्य सरकार, प्रशासन आणि पोलिसांसाठी शरमेची बाब आहे. या घटनेनंतर रुग्णालयाच्या आवारात हिंसाचार उसळला, त्यात गुन्ह्याचे पुरावे नष्ट झाल्याची भीती आहे. किंवा त्या हेतूनेच मोडतोड करण्यात आली का अशी शंकाही घेतली जात आहे. उच्च न्यायालयानेही या बद्दल संताप व्यक्त केला. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी संजोय रॉय हा या वैद्यकीय महाविद्यालयाचा कर्मचारी नाही; पण वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिकारी यांच्याशी त्याचे लागेबांधे असल्याने तो रुग्णालय व महाविद्यालयाच्या सर्व विभागात मोकळेपणाने जाऊ शकत असे. जेव्हा त्याला अटक झाली तेव्हाही तो पोलिसांच्या बराकीतच होता. बलात्कार व खुनाच्या या घटनेमागे मोठी यंत्रणा' व कारस्थान असल्याचा संशय व्यक्त होत आहे. गुन्हेगार, भ्रष्ट पोलिस कर्मचारी, सरकारी अधिकारी व राजकीय व्यक्ती यांच्या अभद्र युतीतून एक संघटना निर्माण झाली आहे. तिला राज्यात सिंडिकेट' असे म्हटले जाते. वैद्यकीय सेवा एवढेच नव्हे, तर शहरी व ग्रामीण प्रशासनातही या सिंडिकेटचे वर्चस्व आहे. सरकारने नेमलेल्या व्यक्तीही या गैरप्रकारात गुंतल्याचे बोलले जाते. साहजिकच कोण, कोठे व कोणाविरुद्ध तक्रार करणार असा प्रश्न आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मोर्चा काढणे, सीबीआयला अंतिम मुदत देणे अशा नाटकी प्रकाराने मूळ दोष नष्ट होणार नाही. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असणारी मोडलेली व्यवस्था' हीच या प्रकरणी जास्त दोषी आहे.

### उपदेशकथा:आळसावर उपाय

एक तरुण वेदाभ्यास केल्यानंतर लग्न करून संसारास लागला. त्याची बायको रोज पोटदुखीचं कारण सांगून दिवसभर झोपून राहात असे. हा बिचारा सर्व घरकाम करीत असे. नवऱ्यानं रांधलेला स्वयंपाक मात्र तिला आवडत असे. जेवण केल्यावर पुन्हा तिची पोटदुखी सुरू होत असे. तिचा पती मात्र दिवसेंदिवस काळजीने खंगत चालला. एकदा त्याचे गुरू भेटल्यावर त्याने ही सर्व हकीकत सांगितली. गुरूंना बाईच्या पोटदुखीचं कारण लक्षात आलं. ते म्हणाले, 'हा काढा तिला प्यायला दे. मात्र, तिने हे औषध नाही घेतलं तर या दंडुक्यानं दोन तडाखे दे. तिचं दुखणं पळून जाईल.' बाईनं औषध घेण्यास नकार दिला. तिच्या नवऱ्यानं दंडुक्याचा प्रयोग करावा लागेल, असं सांगताच तिनं औषध न घेता मी बरी होईन, असं सांगितलं व दोन दिवसांची मुदत मागून घेतली. तिचा रोग तात्काळ बरा झाला.

**कथा उपदेश :** आळसाच्या रोगावर रामबाण औषध सापडते. त्याचा चतुराईनं वापर करणारा वैद्य हवा.

# इच्छा असेल तिथे मार्ग



इच्छा असेल तिथे मार्ग आहे असे म्हणतात. मनोरंजनाच्या क्षेत्रात अभिनय करण्याची एका अभिनेत्याची इच्छा होती व ती त्याने मोठ्या जिद्दीने पूर्ण केली. तो अभिनेता म्हणजे प्रणव रावराणे. त्याचा गूगल आई' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

तो मूळचा मुंबईकर. त्याचं गाव कणकवलीत. मुंबईतील राजा शिवाजी विद्यालयात त्याचं शालेय शिक्षण झालं. ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा त्याने पूर्ण केला. त्या दरम्यान दरवर्षी सोसायटीमध्ये एक व्यावसायिक नाटक पाहून त्याप्रमाणे तो इतर मंडळींसोबत नाटक करीत असे.त्यानंतर त्याने निर्माते, दिग्दर्शक रमेश मोरे यांच्या चिंतन' या अभिनय शिबिरामध्ये प्रवेश घेतला. पंधरा दिवसांचं शिबीर केले. शिबीर संपल्यावर जे नाटक झालं त्यामध्ये त्याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे पारितोषिक मिळाले.त्यानंतर त्याच्या जीवनातला टर्निंग पॉइंट म्हणजे निर्माते व दिग्दर्शक रमेश मोरे यांनी त्याला आपण यांना पाहिलत का?' या व्यावसायिक नाटकात काम करण्याची संधी दिली. त्यातील भूमिकेसाठी त्याला अल्फा गौरवच नॉमिनेशन होत. त्या व्यावसायिक नाटकानंतर त्याने एकांकिका केल्या,नंतर प्रायोगिक नाटक केलं व नंतर परत व्यावसायिक नाटक असा त्याचा या क्षेत्रातील प्रवास झाला.

त्यानंतर त्याने सोहळा गोष्ट प्रेमाची' हे व्यावसायिक नाटक केले, त्या नाटकाच्या लिखाणात, दिग्दर्शनात व सेट डिझाईनमध्ये त्याचा सहभाग होता. त्या नाटकासाठी झी गौरवच विशेष लक्षवेधी नाट्यनिर्मितीच पारितोषिक मिळाले. त्याला त्या नाटकासाठी सेट डिझाईनसाठी म. टा. सन्मान ॲवॉर्ड देखील मिळाले. नंतर लेखक, निर्माता, दिग्दर्शक संतोष पवार यांच्या नाटकात कामे केली. नंतर रिलायन्समध्ये नोकरी केली. रिलायन्सच्या नेटवर्क टॉवर डिपार्टमेंटमध्ये तो होता. रिलायन्सचे वाइस प्रेसिडेंट रवींद्र आवटी सरांच्या सहकार्याने त्याचे परत अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण झाले. त्याच्या आयुष्यातील पुढचा टर्निंग पॉइंट म्हणजे त्याला हास्यसम्राट हा स्टँडअप शो मिळाला. शेवटी तो हास्यसम्राट झाला. त्यानंतर तो या मनोरंजनाच्या क्षेत्राकडे फुलटाइमसाठी वळला.

हास्य सम्राटमुळे लोक त्याला ओळखू लागले. त्यानंतर त्याला वस्त्रहरण, वाऱ्यावरची वरात ही नाटके मिळाली. त्या नाटकात दिग्दर्शक संजय जाधव व अभिनेत्री हर्षदा खानविलकर यांनी त्याला पाहिले व दुनियादारी चित्रपटासाठी बोलावले. हा चित्रपट त्याच्या जीवनातील टर्निंग पॉइंट ठरला. त्या चित्रपटातील त्याची सॉरी ही व्यक्तिरेखा खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यातील सगळेच कलाकार रातोरात स्टार झाले.

त्यानंतर त्याने किचन कलाकार मालिका केली. आटपाडी नाईटस, प्रीतम हे चित्रपट केले. वासूची सासू हे नाटक त्याने केले, त्यामध्ये सासूची भूमिका त्याने केली. ते नाटक पाहून झाल्यानंतर त्याला आटपाडी नाईटस चित्रपट मिळाला. नंतर प्रीतम हा चित्रपट मिळाला. हेमाडपंथी ही सीरिज मिळाली. मस्का हा चित्रपट त्याने केला.गुगल आई' हा त्याचा नवीन सिनेमा लवकरच रिलीज होणार आहे. हा फॅमिली ड्रामा चित्रपट आहे. यामध्ये तो, त्याची पत्नी व त्याची मुलगी असे कुटुंब दाखविले आहे. एका कलाकाराला काम मिळालं नाही तर त्याची होणारी घुसमट या चित्रपटामध्ये पहायला मिळणार आहे. या चित्रपटातील नायकाला लेखक व दिग्दर्शक व्हायचे असते. परंतु त्याला संधी मिळत नाही. तो त्यासाठी प्रयत्न करीत असतो. उदरनिर्वाहासाठी तो ओला - उबेर गाडी चालवत असतो. सिनेमा मिळविण्यासाठी त्याची धडपड सुरू असते. एका दिग्दर्शकाला तो भेटतो व एका वेगळ्याच प्रसंगात तो अडकतो. त्याची मुलगी मोबाईल हाताळण्यात खूपच हुशार असते. तंत्रज्ञानाच्या चांगल्या व वाईट बाजू असतात. त्या वाईट बाजूमध्ये त्याची मुलगी आई-वडिलांना अडकवते. नंतर ते कुटुंब कसे बाहेर पडते, या साऱ्यांची गोष्ट म्हणजे गुगल आई' हा चित्रपट होय.

या चित्रपटाचे शूटिंग हैदराबाद व पुण्यात झाले. यामध्ये पाच गाणी आहेत. गाण्याचे शूटिंग केरळ येथील निसर्गरम्य अशा बीचवर झालेले आहे. हा फॅमिली ड्रामा, संस्पेंस, क्शन, थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक दक्षिणेकडचे आहेत, त्यांना चित्रपटाची भाषा चांगलीच कळते. हा चित्रपट खूपच छान झालेला आहे. प्रेक्षकांनी तो थिएटरमध्ये जाऊन पहावा अशी अपेक्षा त्याने व्यक्त केली.-टर्निंग पॉइंट - युवराज अवसरमल

## तर असा लागला वडापावचा शोध!



मुंबईमध्ये याफ ठिकाणी मिळतील बेस्ट वडापाव

मुंबई: असं वडापाव हा कोणाला आवडत नाही. आपल्या महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्य व्यक्ती, मोठ्या पदावर काम करणारा अधिकारी असूदेत किंवा सेलिब्रिटी असो मात्र, वडापावचं नाव जरी घेतलं की कोणालाच खाण्याचा मोह आवरत नाही. मुंबई आणि मुंबईतला वडापाव हे समीकरणंच जगातभारी आहे. बाहेरच्या देशातून मुंबईत येणारा व्यक्ती वडापाव खाल्या शिवाय मात्र परत जात नाही. आपल्या मुंबईच्या रस्त्यावर वडापाव खाण्यासाठी नेहमीच गर्दी पाहायला मिळते. हा वडापाव काही जणांसाठी तर रोजचं जेवण आहे. काहीजण ह्याला नाश्ता म्हणून खातं तर काहीजण वडापाव खाऊन आपली भूक भागवतं. मुंबईमध्ये लोकल आणि वडापाव हे सर्वत्र प्रसिद्ध आहे. मुंबईच्या वडापावाला केवळ मुंबईतच नव्हे तर भारत बाहेरसुद्धा चांगलीच मागणी आहे. आता हीच लोकप्रियता बघून बाहेरच्या देशात सुद्धा वडापाव विकणारे हॉटेल्स सुरु झाले आहेत. अशातच, या वडापावच्या नावाने अनेक जागा आणि व्यक्ती प्रसिद्ध होताना दिसत आहेत. दिल्लीमध्ये वडापाव विकणारी सोशल मीडियावर प्रसिद्ध असणारी वडापाव गर्ल नावानं प्रसिद्ध असलेली चंद्रिका दीक्षितनं (उहरपवीळञ्जर ऊळीहळीं) वडापाव विकत जगभरात स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. नुकताच झालेला बिग बॉस ओटीटी ३ शोमध्ये ती स्पर्धक म्हणून चांगलीच झळकली होती. आणि आज ती वडापाव विक्री करून रोज ४० हजार रुपयांची कमाई करते.वडापावचा जन्म-अशोक वैद्य यांनी १९६६ साली दादर स्टेशनच्या बाहेर वडापावचा शोध लावला. त्यानंतर दादरमध्येच सुधाकर म्हात्रें यांनी वडापाव विकायला सुरुवात केली. बटाट्याच्या भाजी बरोबर पोळी खाण्यापेक्षा, बटाट्याच्या भाजीचा गोळा करून तो बेसनाच्या पिठात चांगला घोळवून पावात घालून वडापाव तयार करण्यात आला होता. तेव्हा पासून धावपळीच्या जीवनात खाण्यास सोईस्कर, व्यस्त आणि चवीला अगदी मस्त असणारा हा वडापाव मुंबईकरांना फारच जवळचा वाटू लागला. त्यावेळी एका वडापावची किंमत फक्त १० पैसे इतकी होती. आज वडापाव १० रूपयांपासून ते मॉलमध्ये १०० रूपये आणि मोठ्या हॉटेल्स मध्ये तर अगदी ५०० ते १००० रूपयांपर्यंतही मिळतो.वडापावचा इतिहास-वडापावला खरी लोकप्रियता मिळाली ती लालबाग, परेल, दादर आणि गिरगांव येथील मिल मजूरांमुळे. मात्र १९७० ते १९८० च्या आसपासच्या काळात मुंबईमध्ये असणाऱ्या या मिल बंद झाल्या. त्यानंतर रोजगाराचे एक साधन म्हणून अनेकांनी वडापावच्या गाड्या सुरु केल्या. आणि दादरमध्ये सुरू झालेला हा वडापाव मुंबईच्या गल्लीगल्लीत दिसायला लागला. या काळामध्ये दक्षिण भारतीयांच्या विरोधात शिवसेनेने आंदोलन छेडले होते. म्हणून अनेक शिवसैनिकांनी दक्षिण भारतीय पदार्थ सोडून वडापाव खाण्यास सुरुवात केली. आज वेगवेगळ्या ठिकाणी वडापाव वेगवेगळ्या पद्धतीने तयार केला जातो.ही ठिकाणे वडापावसाठी सुप्रसिद्ध आहेत.

मुंबईत कीर्ती कॉलेज जवळचा अशोक वडापाव,
गजानन वडापाव- ठाणे ,
धीरज वडापाव- विले पार्ले
श्रीकृष्ण छबीलदास - दादर
शिवाजी वडापाव- अंधेरी
ग्रॅज्युअट वडापाव- भायखळा
आनंद वडापाव- तळेगाव
जम्बो किंग वडा पाव- परेल
खिडकी वडापाव- कल्याण टिळक
चौकसम्राट वडापाव- सातारा
आराम वडापाव- सीएसएमटी

## पोटात गॅस न होण्यासाठी सकाळी उठून करा हे काम

अनहेल्दी लाईफस्टाईल आणि खाण्यापिण्यामुळे अनेक समस्या सतावत आहेत. पोटात निर्माण होणारा गॅस अशाच गंभीर समस्यांपैकी एक आहे. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी लोक महागड्या औषधांची मदत घेतात. आरोग्यतज्ञांच्या मते सकाळी उठून काही कामे केल्याने यापासून सुटका मिळू शकते.

सकाळी उठल्यावर कोमट पाणी प्या. यामुळे पचनक्रिया सुरळीत होईल तसेच गॅस बनणार नाही.


सकाळी उठल्यावर आल्याचे पाणप्यायल्याने पोटातील गॅसची समस्या कमी होऊ शकते.

तेजपत्ता आणि दालचिनीमध्ये अँटी इन्फ्लामेंटरी गुण असतात यामुळे गॅसपासून सुटका मिळते.बडिशेपाचे दाणे चघळल्यानेही पोटाला थंडावा मिळतो आणि गॅसची समस्या कमी होते.

सकाळी उठल्यावर योगासन आणि प्राणायम केल्याने गॅसची समस्या दूर होते.



## केस घनदाट होण्या साठी दररोज खा हे पदार्थ



मुंबई: प्रत्येक महिलेला वाटते की आपले केस लांब आणि घनदाट असावेत. मात्र ज्यांचे केस पातळ असतात ते केस निरोगी आणि घनदाट बनवण्यासाठी विविध उपाययोजना करत असतात. केस लांब, घनदाट आणि मजबूत करण्यासाठी बऱ्याच गोष्टी कराव्या लागतात. काही गोष्टींचा आपल्या डाएटमध्ये समावेश केल्यास तुम्ही घनदाट केस मिळवू शकता.

अंडी-केसांना पुरेसे प्रोटीन देण्यासाठी तुम्ही अंडी खाऊ शकता. प्रोटीनने भरपूर असलेल्या अंड्याचा डाएटमध्ये समावेश केल्यास फायदा होतो. तुम्ही दररोज नाश्त्यामध्ये अंडी खाऊ शकता. तसेच संध्याकाळच्या वेळेसही अंड्याचे सेवन केले जाऊ शकते.

पालक-केसांसाठी पालक खाणे फायदेशीर आहे. कारण पालकामध्ये लोह मोठ्या प्रमाणात असते. शरीरात आर्यनची कमतरता असल्यास केस गळू लागतात. यामुळे डाएटमध्ये लोहचा समावेश करा.

ड्रायफ्रुट्स-केसांच्या चांगल्या वाढीसाठी ओमेगा ३ फॅटी ॲसिडचे सेवन करणे चांगले असते. जसे बदाम, अक्रोडमध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिडचे प्रमाण भरपूर असते.

आंबट फळे- व्हिटामिन सी शरीरात आर्यन शोषण्यास मदत करतात. यामुळे आपल्या डाएटमध्ये आंबट फळांचा समावेश करावा.

गाजर-व्हिटामिन ए ने भरपूर गाजर केसांच्या वाढीसाठी अतिशय फायदेशीर आहे. व्हिटामिन ए स्काल्पला नैसर्गिक सीबम बनवण्यास मदत करतात. तसेच केसांची मुळेही निरोगी ठेवतात.

## राशी भविष्य



२४ ऑगस्ट २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: पीवळा, शुभ दिशा:पश्चिम
मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील. आर्थिक आवक चांगली राहील. वाचनाची गोडी वाढेल. राहण्यासाठी घराची चिंता दूर होईल.

वृषभ: शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील. व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते.

मिथुन: शुभ रंग काळा, शुभ दिशा:पश्चिम
नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. कौटुंबिक समस्या दूर होईल.

कर्क : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल. वेळेचा दुरूपयोग करू नका.

सिंह: शुभ रंग: लाल, शुभ दिशा : पूर्व
भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

कन्या: शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यत्तिंफ्चे सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. अती उत्साहीपणा दाखवू नका.

तुळ: शुभ रंग : केसरी, शुभ दिशा: उत्तर
कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरूवात करा. विचारपूर्वक निर्णय घ्या.

वृश्चिक: शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण
व्यावसायिक योजना गुप्त ठेवा. देण्या घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

धनु: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण
बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या. व्यावसायामधील वादापासून दूर रहा.

मकर : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
वाद विवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्य करीत असल्यामुळे मान सन्मान मिळेल.

कुंभ: शुभ रंग: काळा: शुभ दिशा:पश्चिम
व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

मीन : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल. कोणाचाही द्वेष करू नका.

२४ ऑगस्टला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, हर्षल शुक्र व बुधाचा प्रभाव आहे. इतरांच्या भावना जपण्याला तुम्ही महत्व देता. माणसाची बरीचशी दु:खे त्याला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य न दिल्याने निर्माण झाली आहेत असे तुमचे मत असते.

व्यक्तीस्वातंत्र्याला तुम्ही महत्व देता. प्रत्येक निर्णय बुध्दीच्या कसोटीवर घ्यावा असा तुमचा आग्रह असतो. जीवनाकडे बघण्याचा तुमचा दृष्टीकोन रसिक व सौंदर्यासक्त वृत्तीचा असतो. भरपूर पैसा मिळवावा व जीवनाचा विविध पातळ्यांवर उपभोग घ्यावा, ऐश्वर्यात जगावे असे तुम्हाला वाटते. उपभोगाच्या अतिरेकाची परिणती चंगळवादात होऊ देऊ नका. प्रलोभने टाळण्यासाठी संयमाचीही गरज आहे. विनासायास धनप्राप्तीच्या जाळ्यात फसू नका. विलासी वृत्तीमुळे दात, जीभ, किडनी यांचे विकार होतील. धूम्रपान, मद्यपान, व्यसनी मित्रांची संगत टाळा.

कार्यक्षेत्र : नवी निर्मिती करण्याची कल्पकता व सर्जनशीलता असल्याने नाटक, चित्रपट, दूरदर्शन या क्षेत्रात आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवू शकाल. लेखन, दिग्दर्शन, रंगभूषा, वेषभूषा या शाखात प्रतिष्ठीत व्हाल. फॅशन डिझायनिंग, मॉडेलिंग, जाहिराती ही क्षेत्रेही अनुकूल आहेत. वाद्यांची निर्मिती टीव्ही, टेपरेकॉर्डर, म्युझिक सिस्टीम, झटपट खाद्यपदार्थ, पंचतारांकित हॉटेल व्यवस्थापन यात यश मिळू शकेल.

प्रणयी जीवन : आपला जोडीदार आकर्षक व्यक्तिमत्वाचा स्वरूपसुंदर असावा अशी तुमची अपेक्षा असते. तुमची चुंबकीयशक्ती जास्त असल्याने अशा अनेक व्यक्ती तुमच्याकडे आकर्षित होतात. बौध्दिक काथ्याकूट करणारी माणसे तुम्हाला आवडत नाहीत. जीवनाचा आस्वाद घेतांना जोडीदारानेही आपल्याला उत्कट साथ द्यावी ही अपेक्षा एप्रिल २१ ते मे २० मधील व्यक्ती पूर्ण करतील.

वर्षफळ : भागीदारीचा प्रस्ताव आल्यास होकार द्या. सहकारी क्षेत्रात लौकिक वाढेल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये शासकीय व्यवहारासंबधी महत्वाचे करार होतील. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये तरूणांना नात्यातल्या स्थळांकडून प्रस्ताव येतील. जानेवारी फेब्रुवारी मध्ये सहचराच्या नावावर जागेची खरेदी करा. मार्च एप्रिल मध्ये प्रकृती सांभाळा. उच्च रक्तदाब त्रास देऊ शकेल. मे जून मध्ये कार्यालयात जबाबदारीच्या जागेवर नेमणूक होईल.

महत्वाचे वर्ष : ६, १५, २४, ३३, ४२, ५१, ६०, ६९.

भाग्यरत्न : हिरा

याच तारेखेची व्यक्ती : न. चि. केळकर, बाळ गंगाधर खेर

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# एकाच मालिकेत दोन्ही भूमिका साकारणे कठीण



तू भेटशी नव्याने या मालिकेत दुहेरी भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्रीने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली आहेत, ती अभिनेत्री म्हणजे शिवानी सोनार. शिवानीचे शिक्षण पुण्यातील शिवाजी नगरमधील पी. इ. एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल येथून झाले. शाळेत असताना लहान गटापासून मोठ्या गटापर्यंत असणाऱ्या प्रत्येक स्पर्धेत तिने भाग घेतला. नृत्य, नाटक, वक्तृत्व, लेझीम यांसारख्या स्पर्धेत तिने भाग घेतला. तिचे अकरावी, बारावीचे शिक्षण मॉडर्न कॉलेजमधून झाले, तर पदवीपर्यंतच शिक्षण एम.आय. टी.मधून झाले. अकरावी, बारावी कॉलेजमध्ये असताना पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत तिने भाग घेतला होता.तिथूनच तिच्या अभिनयाचा श्रीगणेशा झाला. जवळजवळ तीन वर्षे तिने प्रायोगिक नाटकातून कामे केली. बारावीनंतर तिने अभिनयाच्या क्षेत्रात करिअर करण्याचे निश्चित केले. कारण अभिनय करणे तिला आवडू लागले होते. अभिनय करताना तिला कंटाळा येत नव्हता. अभिनयाच्या करिअरमध्ये प्रत्येक वळणावर टर्निंग पॉइंट येत गेले असे ती म्हणाली. तू भेटशी नव्याने ही तिची मालिका सोनी मराठी वाहिनीवर सोमवार ते शुक्रवार रात्री ९ वाजता पहायला मिळत आहे. या मालिकेमध्ये ती तन्वी व गौरी या दोन व्यक्तिरेखा साकारत आहे. त्या दोन्ही व्यक्तिरेखा सकारात्मक आहेत. प्रेक्षकांना दोन्ही व्यक्तिरेखा आवडू लागल्या आहेत. गौरी सगळ्यांना घरा-घरातील वाटते, जवळची वाटते. तन्वीवर जी बंधन आहेत ती इतरांना पहायला मिळतात. या मालिकेला प्रेक्षकांच्या पसंतीची पावती लाभलेली आहे. अभिनेता सुबोध भावे सोबत शिवान-ीची जोडी प्रेक्षकांना खूप आवडलेली आहे. ती साकारत असलेल्या दोन्ही व्यक्तिरेखा सकारात्मक असल्याने, त्या भूमिका साकारताना फार मोठे आव्हान असल्याचे तिचे म्हणणे आहे. याउलट एक व्यक्तिरेखा सकारात्मक व दुसरी नकारात्मक व्यक्तिरेखा साकारताना सोपे असल्याचे तिचे म्हणणे आहे. दोन भूमिका एका मालिकेत करत असणे ही तारेवरची कसरत असते.कारण दररोज तुम्ही प्रेक्षकांसमोर जात असता, त्यावेळी दोन्ही भूमिकेचे वेगळेपण जपणे ही खरोखरच तारेवरची कसरत असते, असे ती म्हणाली. त्या भूमिका प्रेक्षकांना आवडणे हेदेखील महत्त्वाचे असते.

या कसोटीत ती पूर्णपणे यशस्वी झाल्याचे दिसते, कारण प्रेक्षकांना तिच्या दोन्ही भूमिका आवडल्या आहेत. या मालिकेचे कथानक उत्कठावर्धक आहे, त्यामुळे दररोज मालिकेबद्दल प्रेक्षकांच्या व कलाकारांच्या मनामध्ये उत्कंठा वाढत जाते. शिव-ानी सोनारला तिच्या मालिकेसाठी व भविष्यातील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!-टर्निंग पॉइंट - युवराज अवसरमल

# आपल्या मुलांना वाचनची गोडी लावा

ऐसपैस शिक्षण : संदीप वाकचौरे

राज्यात शालेय शिक्षण विभागाच्या वतीने राज्यात महावाचन अभियान सुरू करण्यात आले आहे. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट आहे की, निरंतर अध्ययन, त्या उद्दिष्टाच्या साध्यतेकरिता वाचन हे कौशल्य प्राप्त करण्याची नितांत गरज आहे. वाचन कौशल्याचा केवळ कौशल्य म्हणून विचार करत असताना ते व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी, समाजात शहाणपण आणि विवेकाची पेरणी करता अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. वाचनाचे महत्त्व सांगताना लोकमान्य टिळक म्हणाले होते की, मला कोणी स्वर्गात जा म्हणाले आणि तेथे पुस्तके नसतील तर ते स्वर्गसुद्धा मी नाकारेन. याचा सरळ अर्थ आहे की, जेथे पुस्तके असतात, तेथे स्वर्ग असतो. स्वर्गाच्या कल्पना काही असल्या तरी जीवनातील आनंदाचे क्षण जेथे असतात, तेथे स्वर्ग आहे असे मानायला हरकत नाही. आपल्याला जीवनात येणारे विविध अनुभवांचा विचार करता जीवनात समस्या निर्माण होत असताना त्यावर मात करायची असेल, तर वाचन संस्कार निश्चित मदत करतात. वाचनाचा संस्कार हा जीवनाला सुख देणारा विचार आहे. वाचनामुळे जीवनाला अर्थ प्राप्त होतो. वाचनाने जीवन समृध्द होते. जीवनाचे नेमके उद्दिष्टाच्या दिशेने मार्गक्रमण करणे शक्य होत असते. जो समाज वाचता असतो, तो देश प्रगतीच्या दिशेने झेप घेत असतो. त्यामुळे वाचता समाज निर्माण करणे हे विकासाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे असते. शिक्षणाचा अर्थच निरंतर वाचन असा आहे. आज त्या शिक्षणाच्या प्रक्रियेत वाचनासाठी अभियानाच्या स्वरूपात विशिष्ट कालावधीत कार्यक्रम घ्यावा लागतो, हे शिक्षण प्रक्रियेचे अपयश मानायचे का? असा प्रश्न उपस्थित केला जातो. कारण शिक्षण घेतलेल्या माणसाने जीवनभर वाचत राहण्याची अपेक्षा आहे. माणसाला वाचता येत असूनही तो माणूस जर वाचत नसेल तर तो अशिक्षित समजावा असेही म्हटले जाते.

चिंतन आणि मनन

मुळात उत्तम व जबाबदार नागरिक घडवण्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचन हे कौशल्य आवश्यक आहे. वाचनाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी निश्चित मदत होत असते. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची रूची वाढण्यासाठी मदत होते. वाचन कौशल्य जसे जसे वृध्दिंगत होत जाते, त्याप्रमाणे अभ्यासाला देखील गती मिळण्यास मदत होत असते. वाचन संस्कार जेव्हा विद्यार्थ्याची सवय बनते तेव्हा विद्यार्थी केवळ वाचत नाही. वाचन कौशल्य जसे जसे वृध्दिंगत होत जाते, त्याप्रमाणे आकलन समृध्द होत असते. वाचनाने विद्यार्थी ज्या भाषेतील साहित्य वाचतो, त्या भाषेत विद्यार्थ्याचा विकास होतो. वाचनामुळे विद्यार्थ्याची शब्दसंपत्ती उंचावते. भाषिक कौशल्य आणि शैली विकसित होते. पुस्तके आपण जेव्हा वाचतो तेव्हा ती विविध विषयांची पुस्तके असतात. ती विविध विषयांची पुस्तके माणसांना एकाचवेळी वाचकांच्या हाती आली तर त्या वाचकाला विविध विषयांची माहिती मिळवणे शक्य होते. पुस्तके माहिती देत जातात, त्यातून वाचक विचार करतो, चिंतन, मनन घडत जाते. त्यामुळे माणसाच्या आयुष्यात परिवर्तन करण्याचा मार्ग अधिक सुलभ होतो.

माणसांच्या विचार प्रक्रियेत परिवर्तन आणि जीवनाच्या विकास प्रक्रियेत गती प्राप्त करून देणारी ती सर्वात मोठी व्यवस्था असते. वाचन संस्कारामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला मोठा हातभार लागत असतो. वाचनामुळे विद्यार्थ्यांना स्वतःची अभिरूची विकसित करण्याबरोबर आवडत्या क्षेत्रात प्रगती करण्याची संधी सहजपणे उपलब्ध होते. शासनाच्या वतीने यापूर्वी राबवण्यात आलेल्या उपक्रमात राज्यातील असलेल्या विविध शाळांचा विचार करता सुमारे ६६ हजार शाळांनी त्यात सहभाग नोंदवला होता. या शाळांमधील सुमारे ५२ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सन २०२४-२५ या वर्षात स्टार्स या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत या वर्षात राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये महावाचन उत्सव-२०२४ हा उपक्रम राबविण्यास सुरूवात केली होती. या उपक्रमास रिड इंडिया सेलिब्रेशन यांचे सहकार्य देऊ केले आहे. महावाचन चळवळ ही २२ जुलै ते ३० ऑगस्ट कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी व नववी ते बारावी अशा तीन स्तरावर ही महा वाचन चळवळ आयोजन करण्यात आली आहे.

महावाचन चळवळ

महावाचन चळवळीची अंमलबजावणी करत असताना शासनाच्या वतीने काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. महाउत्सव साजरा होत असताना विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रूजवण्यासाठीचा विचार करण्यात आला आहे. समाजात वाचन संस्कृती रूजवण्यात कोणत्याही सरकारला यश आले, तर सामाजिक संघर्ष कमी होण्यास मदत होणार आहे. समाजात आज जाती, धर्म, विविध पंथ, विचार प्रवाहाच्या निमित्ताने संघर्ष घडत आहेत. अशा परिस्थितीमुळे सामाजिक स्वास्थ बिघडत आहे. त्यामुळे वाचन संस्कृतीने मस्तके घडवली जायला हवी. तसे घडले तर चित्र बदललेले दिसेल. खरेतर शाळेतील विद्यार्थी आणि शाळाबाहेरील नागरिक वाचते व्हायला हवेत.



त्याकरिता शाळांमध्ये समृद्ध ग्रंथालये हवी. आज आपल्याकडे शाळांच्या इमारती आणि इतर भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी जितकी आग्रही भूमिका घेतली जाते, तितकी भूमिका ग्रंथालय निर्मितीसाठी घेताना दिसत नाही. मुळात शाळा म्हणजे केवळ शिक्षक, पाठ्यपुस्तके, इमारत नाही. शाळांच्या प्रक्रियेत सर्वात मोठी गरज आहे ती ग्रंथालयांची. ग्रंथालय जर समृद्ध असतील, तर आपण त्या शाळांमधून परीक्षार्थी न घडवता उत्तम विद्यार्थी घडवण्यास प्राधान्य देऊ. आज पालक, विद्यार्थी आणि अगदी शिक्षकांना देखील अवांतर पुस्तके वाचणे म्हणजे केवळ टाईमपास वाटतो. विद्यार्थ्याला अधिक मार्क मिळावेत म्हणून पाठ्यपुस्तकांचा विचार केंद्रस्थानी केला जातो. त्यामुळे मार्क मिळतील मात्र त्याचा प्रवास माणूस म्हणून घडेल का? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. वाचन म्हणजे केवळ शब्दांच्या महाजालातील प्रवास नाही, तर माणूस म्हणून घडण्यासाठीचा मार्ग आहे. त्यामुळे त्यादृष्टीने वाचन संस्कृतीकडे पाहण्याची गरज आहे.

राज्यात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हे अभियान कामी येईल अशी अपेक्षा आहे. मुळात प्राथमिक स्तरावर विद्यार्थी पायाभूत कौशल्य प्राप्त करत असतात. त्या पायाभूत कौशल्यांमध्ये वाचन कौशल्याचा समावेश आहे. येथे वाचन कौशल्य याचा अर्थ केवळ शालेय पाठ्यपुस्तक वाचने अपेक्षित नाही. त्या पलीकडे विद्यार्थ्यामध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करण्याची गरज असते. त्या दृष्टीने हे अभियान विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रूजवण्यास मदत करणारे ठरणार आहे. विद्यार्थी वाचत नाही यामागे अनेक कारणे आहेत, त्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे त्याच्या भोवती असलेल्या माणसांच्या हातीच पुस्तके नसतील, तर मुलांच्या हाती पुस्तके कशी येणार? मुलांच्या अवतीभोवती वाचन संस्काराचा विचार दिसायला हवा. मुले सुविचार ऐकून आणि केवळ सांगून फार काही शिकत नाही. त्यांना जे शिकवायचे आहे त्यागोष्टी पालक, शिक्षक म्हणून स्वतः ती वाट चालण्याची गरज असते. पालक, शिक्षक जर सतत मोबाइल, दूरदर्शनचा उपयोग करत असतील, तर विद्यार्थी तिकडे आकर्षित होणार यात शंका नाही. वाचता समाज निर्माण करणे महत्त्वाचे आहे आणि आज ते मोठे आव्हान आहे. तसे घडत गेले तर समाज निर्मितीच्या दिशेने पावले पडण्यास सुरूवात होईल.

मुळात विद्यार्थ्याच्या वाचनासाठीचा पहिला टप्पा हा मातृभाषा वाचनापासून सुरूवात होतो. विद्यार्थ्याची जी मातृभाषा आहे त्या भाषेतील पुस्तके वाचनाची सवय रूजली, तर मराठी भाषेसोबत विद्यार्थ्यांची नाळ जोडली जाण्याची शक्यता अधिक आहे.

आज महाराष्ट्रात गेले काही वर्ष इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या वाढत आहे. शासकीय शाळांची संख्या अधिक असली तरी विद्यार्थी पुरेशा प्रमाणात नाहीत, त्यामानाने इंग्रजी माध्यमांची संख्या कमी असूनही विद्यार्थ्यांचा ओढा मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. मुळात इंग्रजी माध्यमातील शिक्षण घेत असताना तेथे मराठी भाषा सक्तीची केलेली असली तरी तेथे होणाऱ्या मराठी भाषेच्या शिक्षणाचा विचार किती गंभीरपणे केला जातो याचाही विचार करण्याची गरज आहे.

त्यामुळे इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये देखील मराठी वाचन संस्कारासाठी निश्चित प्रयत्न करण्याची गरज आहे. असे घडले तर मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे सुलभ होईल. वाचनाच्या निमित्ताने भाषेशी नाते अधिक पक्के होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर मराठी भाषेतील उत्तम आणि दर्जेदार साहित्याचा व लेखक कवींचा विद्यार्थ्यांना परिचय होणार आहे. आज मराठी काय आणि इंग्रजी काय कोणत्याही माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी लेखक, कवी यांच्याविषयी आणि त्यांच्याविषयी फार काही बोल-ता येते असे चित्र नाही. एकीकडे मराठी अभिजात भाषा आहे आणि तिला केंद्र सरकारने मान्यता द्यावी म्हणून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. अशावेळी मराठी भाषेच्या साहित्याचा प्रसार आणि प्रच-ाराची गरज आहे. यावर्षी अमळनेर येथे झालेल्या पुस्तकांची विक्री झाली नाही म्हणून प्रकाशकांनी भरलेली अनामत रक्कम परत द्या, अशी मागणी केली होती. पुस्तक विक्री घडत नसल्याचे सांगण्यात येते. आपल्याकडे वाचन संस्कृती कमी होत असल्याचे अनेकजण सांगत आहेत. खरेतर बारा-तेरा कोटीच्या लोकसंख्येत एखादा हजार पुस्तकांची आवृत्ती संपण्यास पाच-दहा वर्षे लागत असतील, तर परिस्थिती गंभीर आहे हे लक्षात घ्यायला हवे. विद्यार्थ्यांची वाचनाशी नाळ जोडली जायला हवी.

साहित्यिकांचे योगदान


समाज घडवण्यास साहित्यिक मोठे योगदान देत असतात. काळाच्या पुढे जात ते समाजात स्वप्न पेरत असतात.

त्यामुळे त्याबद्दल विचार करण्याची गरज आहे. पाश्चात्य देशात साहित्यिकांचे स्थान अत्यंत वरचे आहे. आजही शेक्सपिअरसारख्या लेखकांचे घर वारसा म्हणून जपला जाते. तेथे जाणारे पर्यटक त्यांच्या घराला भेटी देतात. आम्ही हवे ते देऊ; पण आमचा शेक्सपिअर मात्र देणार नाही, ही त्या देशाच्या नागरिकांची भाषा असते. साहित्यिकांच्या प्रति असलेला हा अभिमान आहे. आज आपल्या देशातील साहित्यिकांची स्मारके किती प्रमाणात जपण्याचा प्रयत्न केला जातो हा प्रश्न आहे. ज्यांनी साहित्यसेवेसाठी योगदान दिले आहे ती माणसे काळाच्या पटलावर हरवत चालली आहेत. समाज आणि व्यवस्था जर साहित्यिकांच्या प्रति कृतघ्नता व्यक्त करणार असेल, तर भविष्यासाठी शाळेत शिकणाऱ्या पिढीने कोणाचे स्मरण करावे हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

व्यक्तिमत्त्व विकास

लोकमान्य टिळक तुरूंगात होते आणि त्यांनी गीतेवर भाष्य करणारे गीतारहस्य लिहिले. तो ग्रंथ इंग्रजांच्या हाती देण्यात आला. त्यांनी तो ग्रंथ अत्यंत सुक्ष्मतेने तपासला गेला. याचे कारण टिळकांच्या शब्दसंपत्तीची शक्ती त्यांना ठाऊक होती. मुळात शब्दात शक्ती असते हे इंग्रज जाणून होते. त्यामुळे समाजात काय पेरायचे आहे हे साहित्यिक करू शकतील. साहित्य माणसांची मस्तके घडवत असतात. ती मस्तके पुस्तकांच्या विचारांनी एकदा घडली की, पुन्हा ती माणसे लाचाऱ्यांच्या फौजेत गुंतून पडत नाही. माणसाला स्वाभिमानाच्या दिशेने प्रवास घडवण्यासाठी साहित्य महत्त्वाची भूमिका बजावत असते. साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासास चालना देणे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व भाषा संवाद कौशल्य विकासास चालना देणे. या उद्दिष्टांच्या दिशेने सहजतेने प्रवास घडणे सहज शक्य आहे. आपल्याला समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात सुरू झालेले हे महावाचन अभियान कायमस्वरूपी रूजले, तर महाराष्ट्राचे चित्र बदललेले दिसेल.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# विद्यापीठाच्या विकासासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करावेत : निंबाळकर



परंडा दि.२३ (प्रतिनिधी) - डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विकासासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करावेत असे प्रतिपादन श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव या संस्थेचे सचिव तथा छत्रपती संभाजीनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य संजय निंबाळकर यांनी दि.२३ ऑगस्ट रोजी केले.

परंडा येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयात आयोजित केलेल्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त ते बोलत होते. पुढे बोलताना निंबाळकर म्हणाले की, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आताचे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या कालावधीमध्ये या विद्यापीठाचा फार मोठा कायापालट झालेला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा आलेख पाहता या विद्यापीठाला त्यांचे नाव दिले. या विद्यापीठांमध्ये या राज्यातीलच नव्हे तर अनेक राज्यातील विद्यार्थी पद्युत्तर शिक्षण व संशोधन कार्य करत आहेत. या विद्यापीठातून अनेक नायक - नायिका, समाजसेवक, राजकीय कार्यकर्ते, पदाधिकारी घडले व घडत आहेत. देशातील अनेक विद्यापीठापैकी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नावलौकिक विद्यापीठ असल्याने या विद्यापीठाच्या विकासासाठी सर्व स्तरातील प्राध्यापक असतील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असतील किंवा प्रशासन असेल सर्वांनी प्रामाणिक योगदान दिल्यास या विद्यापीठाचा आणखीन नामांकन वाढल्याशिवाय राहणार नसल्याचे निंबाळकर यांनी सांगितले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने, महाविद्यालय सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा स्टाफ सेक्रेटरी डॉ शहाजी चंदनशिवे, प्रशासकीय अधिकारी भाऊसाहेब दिवाने, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा किरण देशमुख, प्रा डॉ हरिश्र्चंद्र गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक पद्मा शिंदे व महेश पडवळ यांच्यासह महाविद्यालयातील कनिष्ठ, वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संजय निंबाळकर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ कृष्णा परभने व महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## नेपाळमध्ये नदीत बस कोसळली; १४ जण मृत

तानाहुन : नेपाळमध्ये शुक्रवारी बस अपघात झाला. ४० भारतीय प्रवाशांना घेऊन जाणारी बस तनहुन जिल्ह्यातील मर्स्यांगडी नदीत कोसळली. उत्तर प्रदेशातील ही बस पोखराहून काठमांडूला जात होती. या भीषण दुर्घटनेत १४ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे.

उत्तर प्रदेशातील गोरखपूर इथली नोंदणीकृत बस येथून प्रवाशांना घेऊन नेपाळकडे निघाली होती. बसमध्ये प्रवास करणारे प्रवासी महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे.

नेपाळच्या तानाहुन जिल्ह्यातील अबुखैरेनी परिसरात उत्तर प्रदेशातील बस मर्स्यांगडी नदीत कोसळून अपघात झाला. नेपाळ पोलिसांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. जिल्हा पोलीस कार्यालय तानाहुनचे डीएसपी दीपकुमार राय यांनी म्हटले की, उत्तर प्रदेश एफटी ७६२३ क्रमांकाची बस नदीत कोसळल्याची माहिती मिळत आहे. या बसमध्ये तब्बल ४० प्रवासी होते आणि त्यातील १४ जणांचा मृत्यू झाला.

# परिविक्षाधीन सहायक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा यांची येरगी येथे भेट



देगलूर(प्रतिनीधी): बुधवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी नांदेड येथील परिक्षाविधिन सहायक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा यांनी तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी ला भेट दिली. गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. तसेच मध्यान्ह भोजन योजना बद्दल स्वतः माहिती घेतली. प्रत्येक वर्ग खोल्यात जाऊन तेथील विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

यानंतर बालिका पंचायत राज समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत त्यांनी केलेल्या कार्याविषयी माहिती घेतली. बालिका पंचायत राज बरोबर गावातील बारव,मंदिरे,सरस्वती मंदिर आदींचे दर्शन घेऊन त्याविषयी माहिती घेतली. यावेळी गटविकास अधिकारी शेखर देशमुख, सरपंच संतोष पाटील, ग्रामसेवक राजेश तोटावाड, यांनी ख- ड अनुष्का शर्मा यांचा ग्राम पंचायत च्या वतीने चालुक्य कालीन सरस्वती ची प्रतिमा देऊन सन्मान केला आणि गावात चालू असलेल्या विकास कामासंबधी माहिती दिली. अनुष्का शर्मा यांनी बालिका पंचायत राज समिती बरोबर मनमोकळ्या गप्पा मारल्या आदी ग्रामपंचायत सदस्य व गावकरी उपस्थितीत होते.

# राष्ट्रीय अवकाश दिवस साजरा

देगलूर (प्रतिनिधी) : अज्ञाताला जाणून घेण्याच्या चिकित्सक मानवी प्रवृत्तीतून वैज्ञानिक संशोधनाला नेहमीच एक निश्र्चित दिशा मिळत आलेली आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत प्रतिपादन केलेल्या पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचतत्वांपैकी आकाश तत्व हे पोकळी अर्थात अवकाश किंवा अंतराळ या संकल्पनेशी संबंधित आहे, त्यामुळे अवकाश किंवा अंतराळ जाणून घेण्याची प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने २३ ऑगस्ट २०२४ रोजी पहिल्या राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या आरंभी वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य व भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय अवधाने, प्रा. हनुमंत कदम, डॉ. अनिल जाधव, प्रा. विवेक ठावरे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, २३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३ चे यशस्वी लँडिंग ही इस्त्रोच्या शास्त्रज्ञांची खूप मोठी झेप असून चंद्रावर उतरणारा भारत हा चौथा देश ठरला असला तरी चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशावर उतरणारा भारत हा पहिला देश ठरलेला आहे व ही बाब प्रत्येक भारतीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक डॉ. संजय अवधाने म्हणाले की, भूतलावरील प्रवासापेक्षा पृथ्वीच्या कक्षेबाहेरील प्रवासासाठी खूप मोठे धाडस लागते, इस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी आपल्या ज्ञान व संशोधन शक्तीच्या बळावर असे धाडस चांद्रयान-३ च्या यशस्वीतेतून जगाला दाखवून दिलेले आहे. डॉ. अवधाने यांनी चांद्रयान-३ चा १३ जुलै २३ रोजी पृथ्वीच्या कक्षेपासून सुरू झालेला व २३ ऑगस्ट २३ रोजी चंद्रावर लँडिंग झालेल्या प्रवासाचा आढावा अत्यंत रंजक पद्धतीने घेतला. चांद्रयान-३ च्या प्रक्षेपणासाठी जुलै व ऑगस्टचा महिना निवडण्याच्या पाठीमागची शास्त्रीय भूमिका तसेच त्याचा वेग, अचूक वेळ इत्यादी सर्व बाबी पावर पॉइंटवर स्लाईड शोच्या माध्यमातून सविस्तरपणे विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. डॉ. अनिल जाधव यांनी अंतराळ क्षेत्रातील विविध देशांच्या कामगिरीचा आढावा घेताना कल्पना चावला या महिला अंतराळवीर शास्त्रज्ञाच्या हौतात्म्याची (कोलंबिया यानाचा अंतराळातून पृथ्वीच्या कक्षेत प्रवेश करतानाच्या दुर्घटनेची) दु:खद घटना कथन केली तसेच इस्त्रोच्या आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा त्यांनी आपल्या मनोगतातून घेतला. प्रा. विवेक ठावरे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश कथन केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हनुमंत कदम यांनी केले तर आभार प्रा. दिलीप पस्तापुरे यांनी मानले.

# २९ ऑगस्ट पासून कर्मचारी शिक्षकांचा बेमुदत संप

## मराठवाडा शिक्षक संघाचासंपात सहभागी होण्याचा निर्णय

नांदेड (प्रतिनीधी): विधिमंडळातील घोषणेनुसार जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षा देणारी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करावी या व इतर मागण्यांसाठी राज्यातील कर्मचारी शिक्षक समन्वय समितीने २९ ऑगस्ट पासून बेमुदत संपाची हाक दिली आहे. मराठवाडा शिक्षक संघाने संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षा देणारी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना जो पर्यंत लागू केली जात नाही आणि कर्मचारी शिक्षकांच्या जिव्हाळ्याच्या मागण्या जो पर्यंत मान्य होणार नाही तो पर्यंत बेमुदत संप सुरू राहणार असल्याचे मराठवाडा शिक्षक संघाचेअध्यक्ष सूर्यकांत विश्र्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी म्हटले आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष व्ही आर चिलवरवार यांनी या बाबतीत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की राज्य सरकारी निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने आपल्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत संपाची हाक दिली आहे. मराठवाडा शिक्षक संघाने संपात सक्रीय सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षा देणारी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करावी ही राज्यातील तमाम कर्मचारी वर्गाची मागणी आहेच त्याच बरोबर शिक्षक आणि शिक्षणाच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत. राज्यातील हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बावीस तेवीस वर्षां पासून विनावेतन वा अंशत: वेतनावर काम करीत आहेत, प्रचलित अनुदान सुत्र लागू केले जात नाही त्यामुळे हे शिक्षक शंभर टक्के अनुदाना पासून वंचित आहेत. उच्च विद्याविभूषित तरूण वीस बावीस वर्षां पासून तासिका तत्वावर अल्प मानधनावर काम करत आहेत ही एकविसाव्या शतकातील वेठबिगारीच आहे. शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी भरती बंद आहे. शाळा महाविद्यालयांत शिकवण्यासाठी शिक्षक प्राध्यापक नाहीत तर साफसफाईसाठी सेवक नाहीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मग शाळा महाविद्यालये चालवायची कशी असा प्रश्र्न निर्माण झाला आहे. सरकारच्या नकारात्मक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांमधे तीव्र असंतोष, संताप आणि नाराजी निर्माण झाली आहे. १०,२०, ३० या तीन लाभांची आश्र्वासीत प्रगती योजना शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्यात आली नाही!

शासनाच्या शिक्षक आणि शिक्षण विरोधी धोरणांमुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष आणि नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे समन्वय समितीने पुकारलेल्या संपात सहभागी होण्याचा निर्णय मराठवाडा शिक्षक संघाने घेतला आहे. या संपात सर्वांनी सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष तथा मार्गदर्शक पी. एस. घाडगे,मार्गदर्शक तथा माजी सरचिटणीस व्ही. जी. पवार, विद्यमान अध्यक्ष सूर्यकांत विश्र्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, कोषाध्यक्ष ए. बी. औताडे, सहसचिव सौ रेखा साळुंके, जिल्हाध्यक्ष व्ही. आर. चिलवरवार, सचिव आर. के वाकोडे, केंद्रीय का.स. ई.डी पाटोदेकर, जी पी कौशल्य, आर डी पाटील, डी बी नाईक, बी एस टीमकीकर, विजयालक्ष्मी स्वामी,डॉ. विठ्ठल भंडारे, उत्तम लाटकर, बी डी जाधव, आनंद मोरे,आर पी वाघमारे, गणेश बडूरे, राजेश कदम,एम एस मठपती, प्रा. आनंद करणे, नागोराव रायकोड , शिवानंद स्वामी, शिवराज कदम, मंगेश चाबरेकर, अब्दुल हसीब, किसन केंद्रे, बी जी घाटे यांच्यासह जिल्हा व तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीची जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीत उडी

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुक लढविणार असून राष्ट्रवादी काँग्रेसने जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूकपूर्व हालचाली सुरू केल्या आहेत. जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने २५ स्टार प्रचारकांची घोषणा केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने गुरुवारी आगामी जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकांसाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभारी सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी ही माहिती दिली आहे.

प्रभारी सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी जाहीर केलेल्या यादीत पक्षाच्या २५ प्रमुख नेत्यांचा समावेश असून या भागातील निवडणूक प्रचाराचे नेतृत्व करणार आहेत. या यादीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांच्यासह महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ, एस. आर. कोहली, ब्रिजमोहन श्रीवास्तव आणि जम्मू आणि काश्मीर प्रदेशाध्यक्ष डॉ. तारिक रसूल आदी प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे.

काय म्हणाले ब्रिजमोहन श्रीवास्तव?

या अनुभवी नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली जम्मू आणि काश्मीरमध्ये एक मजबूत आणि प्रभावी मोहिम राबवली जाणार आहे. सर्वसामान्य जनतेला भेडसावणा-या ज्वलंत समस्यांचे निराकरण करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस नक्कीच प्रयत्न करेल असा विश्वास ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी व्यक्त केला.

स्टार प्रचारकांची यादी खालीलप्रमाणे

राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राष्ट्रीय सरचिटणीस एस. आर कोहली, राष्ट्रीय सरचिटणीस आणि जम्मू आणि काश्मीर प्रभारी ब्रिजमोहन श्रीवास्तव, राष्ट्रीय सरचिटणीस आणि अल्पसंख्याक अध्यक्ष जलालुद्दीन, पक्षाचे ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ, राष्ट्रीय सचिव श्रीमती रुही अंजुमन, कार्यकारिणी सदस्य पार्थ पवार, ओबीसी सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष उमाशंकर यादव, राष्ट्रीय मिडिया समन्वयक नवीन कुमार, युवकचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा, विद्यार्थी राष्ट्रीय अध्यक्ष चैतन्य मानकर (सनी), अल्पसंख्याक विभागाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष फैज अहमद फैज, अल्पसंख्याक सेलच्या राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. मुमताज आलम रिझवी, जम्मू आणि काश्मीरचे अध्यक्ष डॉ. तारिक रसूल, अध्यक्ष एमएसएमई मोहम्मद इक्बाल, काश्मिरी पंडित वेलफेअर सेलचे अध्यक्ष अरुण रैना, सरचिटणीस फैयाज अहमद दार, उपाध्यक्ष हरिस ताहिर भट, सरचिटणीस फिरोज अहमद रंगराज, प्रदेश सरचिटणीस तौसीफ भट्ट, गांदरबल, राज्य सचिव संजय कौल, सदस्य इर्शाद अहमद गनी, सुश्री ऐशिया बेगम, सुश्री सलीमा अख्तर, आदींचा समावेश आहे.

**आत्मबोध १**

देवा हीच प्रार्थना ।
घडावी तुझी उपासना ।
दुसरे काही नको मना ।
हेची द्यावे ।। १ ।।

अखंड सेवा घडावी ।
फलेच्छा कदापि नसावी ।
उपासना करून घ्यावी ।
सर्वकाळ ।। २ ।।

देई आता आत्मभान ।
यातून मिळे आत्मज्ञान ।
त्याविण नाही समाधान ।
जीवनात ।। ३ ।।

**सिद्धदास, सोलापूर**

# ओडिशा विधानसभेत रणकंदन; अध्यक्षांच्या आसनाला घेराव

भुवनेश्वर : - विषारी दारूच्या प्राशनामुळे झालेल्या मृत्यूंवरून आज ओडिशाच्या विधानसभेमध्ये विरोधकांनी जोरदार गोंधळ घातला. विरोधी पक्षांमधील काही आमदार एवढे आक्रमक झाले की, त्यांनी थेट विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीकडे धाव घेतली. तसेच अध्यक्षांच्या आसनाला घेराव घातला. या घटनेचा व्हिडीओ आता व्हायरल होत असून, या व्हिडीओमध्ये विधानसभेच्या अध्यक्षांच्या आसनाभोवती आमदार गोळा झाल्याचे आणि सुरक्षा रक्षक त्यांना दूर लोटत असल्याचे दिसत आहे.

ओडिशा विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान, आज (शुक्रवार) कामकाजाला सुरुवात झाल्यावर विरोधी पक्षांनी विषारी दारुमुळे झालेल्या मृत्यूंचा मुद्दा उपस्थित केला. तसेच मुख्य विरोधी पक्ष असलेल्या बीजेडी आणि काँग्रेसचे नेते वेलमध्ये उतरले. त्यांनी गंजम जिल्ह्यातील विषारी दारू कांडावरून गोंधळ घालण्यास सुरुवात केली. तसेच राज्याच्या अबकारी कर मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या सुरमा पाढी ह्या ओडिशाच्या विधानसभेच्या अध्यक्षा आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ओडिशामध्ये भाजपला पहिल्यांदाच बहुमत मिळाले होते. त्यानंतर सुरमा पाढी यांची विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवड केली होती.

# आता शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आंदोलन

जालना : शेतकरी देखील आमचाच आहे. सरकार शेतक-यांच्या कर्जमुक्तीसाठी लक्ष द्यायला तयार नाही. आता आम्ही या प्रश्नात लक्ष घालणार, सरकार कसे कर्जमाफी देणार नाही हे आम्ही बघतो असा निर्धार मनोज जरांगे यांनी आज पत्रकार परिषदेत व्यक्त केला. मराठा आरक्षणानंतर आता आगामी विधानसभा निवडणूक लढण्याच्या तयारीत असताना शेतकरी कर्जमाफीवर जरांगे यांनी घेतलेल्या भूमिकेने राज्यातील राजकारणाला नवे वळण मिळू शकते.

शेतक-यांच्या आंदोलनाबाबत चर्चा करून निर्णय घेऊ.

आता शेतक-यांच्या प्रश्नावर जास्त ताकद लावणार, असल्याचेही जरांगे यांनी जाहीर केले. तसेच निवडणुकीचे आणखी नियोजन नाही. राज्यभरात विधानसभा मतदार संघानिहाय घोंगडी बैठक घेणारे. याची सुरुवात ५ सप्टेंबरपासून गेवराई मतदार संघातून होईल. यावेळी आमची भूमिका लोकसंसमोर मांडणार. घोंगडी बैठकीचा समारोप कुठे करायचा यांबाबत समाजाची भूमिका जाणून घेऊ, असेही जरांगे म्हणाले.


आमचे आरक्षण ओबीसीत आहे. दिल्लीशी आम्हाला काहीही देणे घेणे नाही. त्यांना वेळ काढून न्यायचा होता. सरकार वाटत असलेले पैसे आमचेच आहेत, सरकार काही त्यांचे घर विकून पैसे देत नाही. सरकार आरक्षण देत नाही. चणे आणि रेवड्या देत आहे. आम्ही कट्टर हिंदू आहोत आणि आमचा डीएनए ओबीसींचा आहे एवढेच माहीत आहे असे जरांगे यांनी निक्षून सांगितले.


उदगीरमनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो










उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव

**टी. सी. हरवली आहे**

चोले रमण धोंडीराम रा. कोळनूर (ता. जळकोट जि . लातूर ) या नावाची गुरुदत विद्यालय जळकोट ची १२ पासची मूळ टी. सी. उदगीर ते मुखेड प्रवास करताना हरवली आहे.

**सापडल्यास संपर्क करावा.मो. ९९२३९०५०३१**

## जाहीरनामा

तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)
जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.२२/०८/२०२४

ज्याअर्थी अर्जदार इस्माईल इब्राहीम मुंजेवार वय ५५ वर्ष रा. अतनुर ता.जळकोट जि.लातूर यांचा जन्म मौजे अतनुर ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०६/०६/१९६९ रोजी झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील इस्माईल इब्राहीम मुंजेवार यांचा जन्म दिनांक ०६/०६/१९६९ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी इस्माईल इब्राहीम मुंजेवार यांचा जन्म दिनांक ०६/०६/१९६९ रोजी झालेबाबत कोणास आ-क्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु इस्माईल इब्राहीम मुंजेवार यांचा जन्म दिनांक-०६/०६/१९६९ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय अतनुर ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २२/०८/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख २३/०९/२०२४

**तालुका दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जळकोट**

## जाहीरनामा

**तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय (दंडणिय विभाग)**
**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि, दि. ११/०७/२०२४**

ज्याअर्थी अर्जदार रविंद्र पंढरीनाथ नरहारे रा. सताळा बु. ता.उदगीर यांची मुलगी मंजुषा रविंद्र नरहारे यांचा जन्म दिनांक ०३/०५/२००२ रोजी मौजे सताळा बु. ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आ-लेली नाही. सदरील अर्जदार रविंद्र पंढरीनाथ नरहारे रा. सताळा बु. ता.उदगीर यांची मुलगी यांचा जन्म दिनांक ०३/०५/२००२ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ११/०७/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. सुताला (बु)

त्याअर्थी अर्जदार यांची मुलगी याचा जन्म दिनांक ०३/०५/२००२ रोजी मौजे सताळा(बु) ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आ-क्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार रविंद्र पंढरीनाथ नरहारे रा.सताळा बु.ता. उदगीर यांची मुलगी मंजुषा रविंद्र नरहारे याचा जन्म दिनांक ०३/०५/२००२ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय सताळा बु. ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ११/०७/२०२४ रोजी दिले.
पुढे नेमलेली तारीख १२/०८/२०२४ -

**तालूका दंडाधिकारी तथा,**
**तहसीलदार उदगीर**

## जाहीरनामा

तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय (दंडणिय विभाग )
जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि. १४/०८/२०२४

ज्याअर्थी अर्जदार मंगल नागनाथ जळकोटे रा. सताळा बु.ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०४/०९/१९६४ रोजी मौजे सताळा बु ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार मंगल नागनाथ जळकोटे रा. सताळा बु. यांनी त्यांचा जन्म दिनांक ०४/०९/१९६४ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०५/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०४/०९/१९६४ रोजी मौजे सताळा बु. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार मंगल नागनाथ जळकोटे रा. सताळा बु.यांचा जन्म दिनांक ०४/०९/१९६४ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय सताळा बु. ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. आज दिनांक १४/०८/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख १५/०९/२०२४

**तालूका दंडाधिकारी तथा,**
**तहसीलदार उदगीर**

## जाहीरनामा

**तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)**
**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि**
**दि.२३/०८/२०२४**

ज्याअर्थी अर्जदार चंद्रकांत सोपान देवकत्ते वय ३२ वर्ष रा.मरसांगवी ता. जळकोट जि. लातुर यांच्या मुलाचा नामे संस्कार चंद्रकांत देवकत्ते यांचा जन्म मौजे मरसांगवी ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक. २४/०९/२०१७ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आले-ली नाही. सदरील संस्कार चंद्रकांत देवकत्ते यांचा जन्म दिनांक २४/०९/२०१७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.त्याअर्थी संस्कार चंद्रकांत देवकत्ते यांचा जन्म दिनांक २४/०९/२०१७ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु संस्कार चंद्रकांत देवकत्ते यांचा जन्म दिनांक-२४/०९/२०१७ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय मरसांगवी ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २३/०८/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख २४/०९/२०२४

**तालुका दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जळकोट**

# तर मी युवराजच्या डोक्यात गोळ्या घातल्या असत्या...

**नवी दिल्ली:** योगराज सिंह त्यांच्या वक्तव्यामुळे नेहमी चर्चेत असतात. असंच एक वक्तव्य त्यांनी स्वतःचा मुलगा युवराज सिंहबाबत केलं होत ज्यामुळे ते खूप चर्चेत आले होते. युवराज सिंहला गोळ्या घालेन : आयपीएल २०१३ मध्ये मॅच फिक्सिंगबाबत मोठा वाद झाला होता. यात एस श्रीसंत सह राजस्थान रॉयल्सच्या तीन खेळाडूंना पोलिसांनी अटक केली होती. तेव्हा योगराज सिंहने एका मुलाखतीत म्हंटले होते की जर त्यांचा मुलगा मॅच फिक्सिंगमध्ये सामील असता तर त्यांनी युवराजला गोळ्या घातल्या असत्या.

**टि.सी.हरवली आहे**

माजीपडाण आशिक रऊफ या नावाची १२ वी पासची मुळ टि. सी.,मार्क मेमो व सनद दि.१%/०८/२०२४ रोजी शाहू चौक ते चौबारा दरम्यान हरवली आहे.कोणास सापडल्यास खिलिल मों. नं.वर संपर्क साधावा
मों.नं. ८०८०४०१८६१

## जाहीरनामा

**तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय (दंडणिय विभाग )**
जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.११/०७/२०२४

ज्याअर्थी अर्जदार विठ्ठल सदानंद पांढरे रा. रावणगाव ता. उदगीर यांची मुलगी एंजल विठ्ठल पांढरे यांचा जन्म दिनांक २२/०१/२०१८ रोजी मौजे रावणगाव ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार विठ्ठल सदानंद पांढरे रा. रावणगाव ता. उदगीर यांची मुलगी यांचा जन्म दिनांक २२/०१/२०१८ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०४/०७/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.त्याअर्थी अर्जदार यांची मुलगी याचा जन्म दिनांक २२/०१/२०१८ रोजी मौजे रावणगाव ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार विठ्ठल सदानंद पांढरे रा. रावणगाव ता.उदगीर यांची मुलगी एंजल विठ्ठल पांढरे याचा जन्म दिनांक २२/०१/२०१८ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय रावणगाव ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १५/०७/२०२४ रोजी दिले.
पुढे नेमलेली तारीख १६/०८/२०२४

**तालूका दंडाधिकारी तथा,**
**तहसीलदार उदगीर**

## जाहीरनामा

**तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय (दंडणिय विभाग )**
**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि**
दि. १४/०८/२०२४

ज्याअर्थी अर्जदार गणेश प्रभू मुंडे रा. जयाबायचीवाडी ता.उदगीर यांची मुले नामे १) कोमल गणेश मुंडे हिचा जन्म दिनांक ०५/०५/२००९ रोजी २) पार्वती गणेश मुंडे हिचा जन्म दि.०२/०६/२०११ रोजी ३) दत्तात्रय गणेश मुंडे याचा जन्म दिनांक २१/०८/२०१३ रोजी व ४) रघुनंदन गणेश मुंडे याचा जन्म दिनांक-०७/१०/२०१५ रोजी मौजे जयाबायचीवाडी पो. हेर तालूका उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार गणेश प्रभू मुंडे रा. जयाबायचीवाडी ता.उदगीर यांनी त्यांचे मुले यांचा जन्म नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०७/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.त्याअर्थी अर्जदार यांची मुले याचा जन्म १. कोमल गणेश मुंडे हिचा जन्म दिनांक ०५/०५/२००९ रोजी २). पार्वती गणेश मुंडे हिचा जन्म दि.०२/०६/२०११ रोजी ३) दत्तात्रय गणेश मुंडे याचा जन्म दिनांक २१/०८/२०१३ रोजी व ४). रघुनंदन गणेश मुंडे याचा जन्म दिनांक-०७/१०/२०१५ रोजी मौजे जयाबायचीवाडी पो.हेर तालूका उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सद-रील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार गणेश प्रभू मुंडे रा. जयाबायचीवाडी ता.उदगीर यांची मुले यांच्या वरीलप्रमाणे जन्म तारखेची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हेर ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. पुढे आज दिनांक १४/०८/२०२४ रोजी दिले.

नेमलेली तारीख १५/०९/२०२४

**तालुका दंडाधिकारी तथा,**
**तहसीलदार उदगीर**

## जाहीरनामा

**श्री.एस. एल. फुले, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांच्या न्यायालयात**

कोर्टाचा शिक्का

**वारसा प्रमाणपत्र क्र. १४६१/२०२४**
**शमा व इतर ३ वि. निरंक**
**निशाणी क्रमांक ०६**
**वारसाचे सर्टिफिकेटबद्दल**

ज्यापेक्षा मयत हरिराम केशव रणखांब यांचा दिनांक २६.१०.२०१६ रोजी बोरवटी ता. जि. लातूर येथे मृत्यू झाला. उपरोक प्रकरणात अर्जदार १. शमा भ्र. हरिराम रणखांब, वय-६२ वर्षे, धंदा-घरकाम, २. रामदास पिता हरिराम रणखांब, वय-४० वर्षे, धंदा-नौकरी, ३. दयानंद पिता हरिराम रणखांब, वय-३४ वर्षे, धंदा-नौकरी, ४. मनिषा भ्र. शेषेराव लकडे, वय-३९ वर्षे, धंदा-घरकाम, सर्व रा. बोरवटी ता. जि. लातूर, यांनी मयत हरिराम केशव रणखाब याचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यानी उपरोक्त प्रकणात मयत हरिराम केशव रणखांब याच्या मृत्यूपश्चात अर्जदार याना मयताचे कायदेशीर वारस घोषीत करुन तसे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ व फायदे घेण्यासाठी त्याच्या हक्कामध्ये बारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे. त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार है मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिग्याच्या आत या कोटांत हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल,

आज तारीख २३.०८.२०२४
पुढील तारीख १०.१०.२०२४

**आदेशावरुन**
**सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर. लातूर**

**ए. के. धोकटे**
**क. लिपीक**


**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४–६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३–३४ | | ६८–८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५–७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८–८६ | | ७२–२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
99 93 94 16 69
संपर्क 98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय–अस्त | | सिंगल:९–५–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७–४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय–अस्त | | सिंगल:०–३–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४–० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय–अस्त | | सिंगल:७–१–४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०–७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26


**पान १ वरून**

### भाजपच्या...

सुद्धा बरीच गणिते अवलंबून असणार आहेत.

तिन्ही पक्षांमध्ये बंडखोरी अटळ

जागावाटपामध्ये समाधानकारक जागा वाट्याला न आल्यास या तिन्ही पक्षांमध्ये बंडखोरी अटळ आहे. कोल्हापूरमध्ये कागलमधून वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची उमेदवारी अजित पवार गटाकडून जाहीर करण्यात आल्यानंतर भाजपचे समरजित घाटगे तुतारी फुंकण्याच्या तयारीत आहेत. दुसरीकडे कोल्हापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष राहुल देसाई यांनी सुद्धा आपल्या राजीनामा दिला आहे.

उमेदवारी निश्चितीसाठी सर्वेक्षण करणार

यापूर्वी सुद्धा भाजपकडून एक उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान आमदारांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. मात्र, या सर्वेक्षणामध्ये बहुतांश आमदारांची कामगिरी असमाधानकारक होती. त्यामुळे आता पुन्हा एकदा भाजप आणि संघांकडून उमेदवारी निश्चित करण्यासाठी सर्वेक्षण केले जाणार आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये ज्या पद्धतीने शिंदे गटाला आणि अजित पवार गटाला सातत्याने सर्व्हेचा दाखला देऊन अधिकाधिक जागा घेण्याचा प्रयत्न भाजपकडून झाला होता.

### महाराष्ट्रातील...

दरम्यान, भारत आणि पोलंड यांच्यात चांगले संबंध राहिले आहेत. पोलंडचे खेळाडू भारतात खेळल्या जाणा-या प्रो कबड्डी लीगमध्ये सहभागी होत असतात. स्पिक्झको स्वत: पीकेएलमध्ये खेळणारे पहिले पोलंडचे खेळाडू आहेत. २०१५ मध्ये त्यांना बेंगलुरु बुल्सच्या फ्रँचायझीने खरेदी केले होते.

### ३ सप्टेंबरपासून...

मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रातील जनतेला न्याय देत असताना त्यांनी कर्मचा-यांना देखील न्याय द्यावा. वेतन आयोगाच्या धर्तीवर करार करून राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे पगार वाढ द्यावी, अन्यथा कृती समितीच्या माध्यमातून ३ सप्टेंबरपासून एसटी कर्मचारी मोठे आंदोलन छेडतील असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

कृती समितीच्या माध्यमातून आक्रोश

मागील काळात महामंडळ आर्थिक संकटात होते. आता आर्थिक संकटातून बाहेर पडलेले असताना गेल्या अनेक वर्षांपासून कामगारांचा करार प्रलंबित आहे. त्या अनुषंगाने विविध पातळीवर मागण्या करण्यात आल्या. परंतु, मागण्यांचा मार्ग मोकळा होत नव्हता. म्हणून कामगार संघटनेच्या पुढाकारातून महाराष्ट्रातील श्रमिक संघटनांची एक कृती समिती तयार झाली आहे. त्या कृती समितीच्या माध्यमातून वेगवेगळ्या पातळीवर आंदोलन झाले.

राज्यभरात आक्रोश आंदोलन

याची दखल घेऊन मागील सात तारखेला कॅबिनेट मंत्रीमंडळ बैठक पार पडली. त्यात धोरणात्मक बाबीवर चर्चा झाली. तसेच पुढच्या कॅबिनेटमध्ये कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र अजून कुठलीही कृती समितीच्या माध्यमातून आज राज्यभरात आक्रोश आंदोलन पार पडत आहे.

### न्यायालयाच्या...

मात्र निषेध करण्यासाठी आम्ही एकत्र बसणार आहोत, असे नाना पटोलेंनी स्पष्ट केले.

मुंबई उच्च न्यायालयाने सदर बंद घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. सदर निर्णयाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात तातडीने दाद मागणे वेळेच्या मर्यादेमुळे शक्य नाही. भारतीय न्यायव्यवस्था संविधानात्मक संस्था असल्याने संविधानाचा आदर राखून उद्याचा बंद मागे घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे, असे शरद पवार यांनी एक्सवर (ट्विटर) म्हटले होते.

राज्यात काही लोकांना मुख्यमंत्रीपदाची खुर्ची मिळवण्यासाठी एवढी घाई झाली आहे की, लोकांच्या दुःखातही त्यांना राजकीय संधी दिसत आहे. त्यामुळे अशी विकृती वेळीच ओळखली पाहिजे. लाडकी बहीण योजना रोखण्यासाठी देखील विरोधक कोर्टापर्यंत गेले होते. मात्र, तिथे देखील त्यांना न्यायालयाने फटकारलं. असाच प्रकार आज झाला असून महाराष्ट्र बंद करणाऱ्यांना कोर्टाने परत एकदा चपराक लावली आहे. - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

बदलापूर सारख्या घटना होऊ नये, पण त्याचे राजकारण होऊ नये. काही लोक मतासाठी मिंध्ये झालेत. आरोपीला फाशी देणार आहे. हा समाजाचा प्रश्न आहे, जो पर्यंत महिला मुलींना सन्मान देणार नाही, तो पर्यंत विकृत प्रवृत्ती राहतील. पण त्यांना आम्ही ठेचणार आहोत. महाराष्ट्र बंदची काही पक्ष घोषणा देत आहेत. २०२०-२१ साली ज्या घटना घडल्या, तेव्हा तुमचे सरकार होते. तेव्हा तुम्ही काहीच बोलले नाहीत. कलकत्तामध्ये इतका निर्घृण प्रकार झाला तरी तुम्ही काही बोलले नाही. तुम्हाला निव्वळ राजकारण करायचे आहे. - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

शरद पवार यांनी घेतला होता यू टर्न

खरंतर, महाविकास आघाडीच्या सहयोगी पक्षांकडून जाहिर करण्यात आलेल्या बंदला आव्हानावरून वकील आणि याचिककर्ते गुणरत्न सदावर्ते यांनी न्यायालयाला अपील केले होती की हा बंद बेकायदेशीर आहे. यावर सुनावणी करताना न्यायालयाने आदेश दिला की कोणताही राजकीय पक्ष बंदचे आवाहन करू शकत नाही. जर असे कोणता पक्ष करत असेल तर राज्य सरकारने त्यावर कारवाई करावी. या निर्णयानंतर शरद पवारांनी बंद मागे घेतला.

काळी पट्टी बांधून विरोध करणार विरोधी पक्ष

दरम्यान, २४ ऑगस्टला विरोधी पक्ष काळी पट्टी बांधत विरोध प्रदर्शन करतील. तर नागपूरमध्ये काँग्रेस आमदार आणि विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वड्डेटीवार आणि नागपूर काँग्रेसचे नेते तोंडावर काळी पट्टी बांधून बदलापूर अत्याचार प्रकरणाचा विरोध दर्शवतील.

### जागतिक...

पहिले सुवर्ण मिळवून देईल, असा विश्वास होता. पण हे होऊ शकले नाही. अंतिम सामन्याच्या अवघ्या काही तासांपूर्वी वजन जास्त असल्याने तिला अपात्र घोषित करण्यात आले. तपासणीत विनेशचे वजन १०० ग्रॅम जास्त होते. यामुळे ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण जिंकण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

### नीरज चोप्राने...

सहाव्या प्रयत्नात नीरजचा कारकिर्दीतील सर्वोत्तम ८९.४९ थ्रो केला.

पॅरिस ऑलिम्पिकचा विक्रम मोडला

दरम्यान, नीरज चोप्राने २०२४ च्या ऑलिम्पिकमध्ये ८९.४५ फेक करून रौप्यपदक जिंकले होते. हा त्याचा सर्वोत्कृष्ट थ्रो होता पण लॉसनेमध्ये त्याने आपला विक्रम आणखी सुधारला आहे. कदाचित, तो डायमंड लीगच्या अंतिम फेरीत आणखी चांगली कामगिरी करेल आणि ९० मीटरचे लक्ष्य गाठेल. नीरजला आतापर्यंत ९० मीटर भालाफेक करता आलेली नाही. २०२२ मध्ये नीरजने डायमंड लीगमध्ये सुवर्ण तर २०२३ मध्ये त्याच स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते.

### मुंबई आणि...

माहिती मिळाली होती. पण त्यांनी एवढी मोठी घटना शिक्षण विभागाला कळवलीच नाही. त्यांनी याबाबत वेळीच सांगितले असते राज्य सरकारने वेळीच कारवाई केली असती व पुढचे आंदोलन, जनतेचा उद्रेक टाळता आला असता. तसे न झाल्यामुळे ही निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये सीसी टीव्ही कॅमेरे लावण्याबाबत दोन वर्षांपूर्वीच आदेश दिले होते. मात्र त्याबाबत अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. केवळ निविदा प्रक्रिया सुरू असल्याचे कारण दिले जाते. त्यामुळे शिक्षणाधिकारी कंकाळ यांना निलंबित करण्याचे आदेश दिल्याचे केसरकर यांनी सांगितले. या प्रकरणी कंकाळ यांच्याकडून स्पष्टीकरण घेतले जाईल, हे निलंबन जास्तीत जास्त सहा महिन्यांपर्यंत असू शकते, असेही त्यांनी सांगितले.

अतिरिक्त आयुक्तांचे धाबे दणाणले

पालकमंत्र्यांच्या या घोषणेमुळे शिक्षण विभागाची जबाबदारी असलेले अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांची चांगलीच पंचाईत झाली. पत्रकार परिषद सुरू असताना मध्येच सैनी हे मंत्र्यांच्या बाजूला बसून मनधरणी करताना दिसत होते. निलंबन मागे घेण्यास विनवणी करीत होते. महिन्याभरात सीसी टीव्ही कॅमेरे लावण्याची हमी दिल्यास हे निलंबन मागे घेऊ, आता निलंबन मागे घेणार नाही, असे केसरकर यांनी सांगितले.

खासगी शाळांनाही इशारा

खासगी शाळांमध्येही सीसी टीव्ही कॅमेरे लावण्याची प्रक्रिया खासगी शाळाचालकांनी पूर्ण करावी अन्यथा या शाळांचे अनुदान रोखण्यात येईल, असाही इशारा केसरकर यांनी यावेळी दिला.

पालिकेच्या सुमारे एक हजार इमारती असून शिक्षण विभागाने शहर विभागातील १२३ शाळांमध्ये २८३२ सीसीटीव्ही लावण्यासाठी १८ कोटींच्या कामाच्या निविदा मागवल्या असल्याचे समजते. मात्र ही निविदा प्रक्रिया मध्यवर्ती खरेदी खात्याच्या स्तरावरच प्रलंबित असल्याचे समजते.

### ए-१, ए...

ज्याला बीटा-केसिन ए १-कॅसोमॉर्फिन-७ (बीसीएम-७) म्हटले जाते. काही लोकांच्या मते हे पेप्टाइड पाचन तंत्राशी संबंधित समस्यांचे कारण बनू शकते. याशिवाय ए-२ देखील एक प्रकारचे प्रोटीन आहे. हेही गायीच्या दुधातच आढळते. ए-१ आणि ए-२ या दोन्ही प्रकारच्या दुधात बीटा-केसीन प्रोटीनचे स्ऐट्रक्ऐचर मात्र वेगवेगळे असते.

### मुख्यमंत्री माझी...

याची काळजी घ्यावी. यासोबतच मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या लाभार्थी महिलांच्या बँक खात्यांना आधार क्रमांक जोडण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी. वयोवृद्ध नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री वयोश्री योजना आणि मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक पात्र व्यक्तीला मिळण्यासाठी तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करून लाभार्थी नोंदणीला गती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केल्या. तसेच वयोवृद्ध नागरिकांचे अर्ज भरून घेण्यासाठी ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्यांना मदत करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांना प्रशिक्षणाची संधी देण्यासाठी प्रत्येक शासकीय विभागाने प्रयत्न करावेत. तसेच जिल्हा आणि तालुकास्तरीय अधिकारी यांनी उद्योग, व्यवसायामध्येही युवकांना प्रशिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजनेचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

### पुढील दोन...

परिसरात देखील जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच घाट परिसर सोडता शहरी भागातही हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

उत्तर महाराष्ट्रासह मराठवाडा विदर्भातही जोरदार पावसाची शक्यता

उत्तर महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. वादळी वाऱ्यासह काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्याठिकाणी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यातही उद्या अनेक भागात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे. नांदेड, हिंगोली, परभणी, जालना आणि छत्रपती संभाजीनगरासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच विदर्भात देखील उद्या वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा आणि अमरावतीसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पावसाच्या पार्श्र्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी

दरम्यान, राज्यात पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे. या पावसाच्या पार्श्र्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी असं आवाहन प्रशासनानं केलं आहे. दरम्यान, सध्या राज्यातील बहुतांश भागात चांगला पाऊस झाला आहे. नदी नाले धरणांच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सोमवार दिनांक २६ ते शुक्रवार ३० ऑगस्ट दरम्यानच्या पाच दिवसादरम्यान कमाल तापमान वाढीबरोबर महाराष्ट्रात पुन्हा उन्हाचा पारा चढण्याची शक्यता जाणवते.

### आरक्षणासह...

मोठा दिलासा मिळाला आहे. प्रवाशांसाठी ऑनलाईन पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल मध्य रेल्वे प्रशासनाचे क्षेत्रीय सल्लागार समितीचे सदस्य चंद्रकांत कातळे यांनी आभार व्यक्त केले आहेत.


लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



# यशवंत उदगीर



शनिवार दि. २४ ऑगस्ट २०२४

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# भाजपाने दिले एकाच वेळी ३ तालुकाध्यक्ष; कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपाची गटबाजी चव्हाट्यावर .. !

माधव होनराव

जळकोट : प्रतिनिधी- भाजपाचे मा. आमदार सुधाकर भालेराव यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिल्यानंतर त्यांच्याच गटाचे जळकोट तालुका अध्यक्षपदी राजेंद्र केंद्रे हे कार्यरत होते. परंतु आ. भालेराव यांनी तुतारी हातात घेतल्यानंतर भाजपाचे तालुकाध्यक्ष पद रिक्त झाले होते. नवीन अध्यक्ष कोण होणार ? मतांची गणिते कशी घालणार ? निष्ठावंतांना न्याय मिळणार का ? याकडे तालुक्याचे लक्ष लागलेले होते. अशातच तीन दिवसात एकापाठोपाठ तीन जणांना ता. अध्यक्षपपदी निवड झाल्याचे पत्र मिळाल्यामुळे सर्वत्र तालुका अध्यक्ष पदाच्या निवडीची चर्चा मात्र चांगलीच रंगली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गटबाजी चव्हाट्यावर आली आहे. याबाबत वरिष्ठांनी तात्काळ लक्ष देऊन तिघांना एकत्र करून एकच अध्यक्ष जाहीर केल्यास होत असलेली चर्चा थांबणार असून कार्यकर्त्यातील संभ्रम दूर होणार आहे.

भारतीय जनता पार्टीच्या जळकोट तालुका अध्यक्षपदाची निवड जाहीर झाली असून भाजपाने तिघांना तालुकाध्यक्षपदी नियुक्ती दिली आहे. भाजपाच्या तीन वरिष्ठांनी कार्यकर्त्यांना नियुक्तीचे पत्र स्वाक्षरीसह दिले असल्यामुळे खरा तालुकाध्यक्ष कोण ? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस संजय केनेकर यांच्या स्वाक्षरीने जळकोट येथील भाजपाचे यापूर्वीचे दोनदा ता. अध्यक्षपद भूषविलेले ज्येष्ठ कार्यकर्ते सोमेश्र्वर सोप्पा यांना भाजपाच्या तालुकाध्यक्ष पदाची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या निवडीचे स्वागत होते न होते तोपर्यंतच दुसऱ्या दिवशी अचानकपणे भारतीय जनता पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी रावणकोळा येथील सत्यवान व्यंकटराव पांडे यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. तद्नंतर लगेचच तिसऱ्या दिवशी स्वयंसेवक यांच्या स्वाक्षरीने संघाचे रत्नाकर गंगाधर केंद्रे(रा. पाटोदा ) यांना नियुक्तीचे पत्र मिळाले आहे. एकापाठोपाठ एक अध्यक्षपदाचे तीन बॉम्ब पडल्या मुळे तालुक्यात भाजपाच्या तालुकाध्यक्षपदाची चर्चा चांगलीच रंगली आहे.

या तीन केलेल्या नियुक्त्या मध्ये भाजपाचे अध्यक्षांमध्ये पहिले पत्र लिंगायत समाजाचे सोमेश्र्वर सोपा यांना दिले. दुसरे पत्र मराठा समाजाचे सत्यवान पांडे यांना मिळाले तर तिसरे पत्र वंजारी समाजाचे रत्नाकर केंद्रे यांना मिळाले. त्यामुळे प्रत्येक समाजाला अध्यक्षपदाचे स्थान देऊन खुश करण्याचा प्रयत्न तर नाही ना ? अशीही चर्चा जळकोट शहर व तालुक्यात रंगलेली आहे. कार्यकर्ते मात्र सर्वांचेच हसत मुखाने अभिनंदन करत आहेत.

तालुकाध्यक्ष नेमण्याचा अधिकार हा जिल्हा अध्यक्षांना असतो. असे सर्वजन चर्चा करत आहेत. जिल्हाध्यक्षांनी तालुकाध्यक्ष नियुक्तीसाठी तालुक्यातील कार्यकर्त्यांची व्यापक बैठक बोलावून निवड करायला हवी होती. असे भाजपाच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. परंतु आले मालकाच्या मना तिथे कोणाचे चालेना ? अशीच कांहीशी अवस्था झालेली दिसते. प्रत्येक जण मीच भाजपाचा तालुकाध्यक्ष म्हणून सांगत आहे तिघेही एकत्र यायला तयार नाहीत. सोशल मीडियावर प्रत्येकांचे चाहते आपापल्या तालुका अध्यक्षांचे अभिनंदन करत असून जागोजागी ही चर्चा रंगतदार होत चालली आहे.




# देवाची जागा माणसाला देणारा महापुरुष

## अण्णा भाऊ साठे: थोर साहित्यिक :उत्तम कांबळे

उदगीर (प्रतिनिधी)- अण्णाभाऊ साठे हे साहित्याचे पर्व निर्माण केले. हे वास्तववादी लेखक होते. अण्णा भाऊ साठेनीं पारंपरिक नायक बदलला ज्या जातींना इंग्रजीनी गुन्हेगार समजले त्या गुन्हेगारांना साहित्यात नायकत्व दिले.नायिका प्रधान साहित्य पहिल्यांदा मराठी साहित्यात अण्णाभाऊ साठे यांनी लिहिले. देवाची जागा माणसाला देणारा महान साहित्यिक अण्णा भाऊ साठे होते, अण्णाभाऊंचा जन्म झाला आणि मराठी साहित्यातील पारंपरिक नायकाचा अंत झाला. असे विचार लसाकम उदगीर शाखेने अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के हे होते.यावेळी विचारमंचावर शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरविंद नवले, उज्वल ग्रामीण महाविद्यालय घोनसी येथील प्राचार्य डॉ सदानंद गोणे, उदगीरचे माजी नगराध्यक्ष रामकिशन सोनकांबळे सत्कारमूर्ती ज्ञानोबा थोरे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरूवात शाहीर अंकुश सिंदगीकर यांच्या क्रांतीगीतानी झाली.

यावेळी लसाकम शाखा उदगीरच्या वतीने ज्येष्ठ समाजसेवक ज्ञानोबा थोरे यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले तसेच आदर्श शिक्षिका श्रीमती प्रभावती वडजे आदर्श ग्रामसेविका उज्वला जाधव, अभियंता सुहास हणमंते,अश्र्विन हणमंते, नितीन वाघमारे,अक्षय खादीवाले, आशय चिमोरे, जान्हवी कांबळे, आर्यन शिंदे,आशिष सूर्यवंशी, निखिल मोटे,स्नेहा वाघमारे आदींचा सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना उत्तम कांबळे म्हणाले की, शब्दाला चारित्र्य असते. अण्णा भाऊ साठेंनी शब्दाला चारित्र्य दिले.महापुरुष कधीच स्पर्धा करीत नसतात ते त्यांच्या विचार कार्यामुळेच मोठे होते.इतिहासात जगायला अक्कल लागत नाही तर वर्तमानात जगायला अक्कल लागते.अण्णाभाऊंना मुळाशी जाऊन समजून घेतले पाहिजे. अण्णाभाऊंनी माझी मैना गावावर राहिली ही राजकीय छक्कड लिहिली.कॉम्रेड होणे कठीण काम असते.कॉम्रेड म्हणजे स्वतःशी लढाई असते. मिथके मोठी करण्यापेक्षा माणसाला मोठी करा ही शिकवण अण्णाभाऊ साठेंनी समाजाला दिली.वेदना आणि प्रतिभेतून अण्णाभाऊंचे साहित्य जन्माला आले.शाळेत माहिती मिळते आणि शाळेबाहेर ज्ञान मिळते ते अण्णाभाऊ साठेनी मिळविले.अण्णा भाऊ साठे यांनी उपेक्षित वंचित जात समुहातील माणूस नायक केला, अण्णाभाऊंनी जातविरहीत समाजासाठी साहित्य लिहिले. असे विचार यावेळी त्यांनी मांडले.या कार्यक्रमाला उदगीर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य गोविंद भालेराव यांनी केले तर आभार प्रल्हाद येवरीकर यांनी मानले.

# अंधश्रध्देला बळी पडलेले कुटुंब उध्वस्त होतो- रुक्साना मुल्ला

उदगीर (प्रतिनिधी) कुटुंबात लहान मुलांना बालवयांपासूनच स्त्री-पुरुष भेदाभेद न करता त्यांच्या वैज्ञानिक जाणिवा जागृत करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. ज्या कुटुंबांमध्ये अंधश्रध्दा पोसली व वाढवली जाते ते कुटुंब उध्वस्त होते असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या राज्य सरचिटणीस रुक्साना मुल्ला यांनी केले.

उदगीर वीरशैव समाजाच्या वतीने धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या ८५ वा स्मृतिदिनानिमित्त आयोजित ९० वा वचन सप्ताहात सोमवारी पाचवे पुष्प गुंफण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर होते. यावेळी विचारपीठावर वीरशैव समाजाचे सचिव अँड. श्रीकांत बडीहवेली उपस्थित होते. प्रारंभी महात्मा बसवेश्र्वर व धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण




करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आपले विचार व्यक्त करताना रुक्साना

मुल्ला यांनी, माणसाच्या कल्याणासाठी विज्ञान आणि विवेकाचा विचार वाढला पाहिजे व आपण प्रथम माणूस आहोत याचे भान ठेवले पाहिजे. सर्वच धर्मात अंधश्रद्धा असून अहंकार न बाळगता आपण कार्यकारण भाव शोधले पाहिजे व चिकित्सा केली पाहिजे असे सांगून पुरोगामी विचारांचे समाजसुधारक महात्मा बसवेश्र्वर यांनी बाराव्या शतकात कर्मकांडाला विरोध करून विज्ञान व विवेक लोकांमध्ये रुजवला

असे नमूद केले. अध्यक्षीय समारोपात तहसीलदार राम बोरगावकर यांनी, सर्व धर्मातील महापुरुषांनी मानवतेची शिकवण दिलेली असून बाराव्या शतकात महात्मा बसवेश्र्वर यांनी मानवधर्म सांगून सामाजिक क्रांती केली आहे. बुद्धांचे पंचशील आणि महात्मा बसवेश्र्वर यांची वचने ही सारखीच आहेत. माणसाने खोटे बोलू नये, चोरी करू नये, हिंसा करू नये, व्यसन करू नये हीच शिकवण महापुरुषांनी दिली असून जातीधर्मांची चौकट मोडून केवळ मानव कल्याणासाठी आपण झटले पाहिजे असे आवाहन केले. प्रत्येक गोष्टींकडे डोळसपणे पहावे. ईश्र्वर माणसात आहे. माणसातला ईश्र्वर आपण जोपासला पाहिजे असेही नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँड. महेश मळगे यांनी केले. सुत्रसंचालन उत्तरा कलबुर्गे यांनी केले. आभार रविंद्र हसरगुंडे यांनी मानले. कार्यक्रमास समाजबांधव उपस्थित होते.

# भाजपच्या ओबीसी सेलच्या शहराध्यक्षपदी मोतीलाल डोईजोडे

## भाजपच्या विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर




उदगीर : भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी सेलच्या शहराध्यक्ष पदी मोतीलाल डोईजोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मोतीलाल डोईजोडे यांची नियुक्ती केल्याचे पत्र भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

भारतीय जनता पक्षाच्या विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी नुकत्याच जाहीर करण्यात आल्या. यात भाजप ओबीसी सेल शहराध्यक्ष पदी मोतीलाल डोईजोडे,

भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी बालाजी तानाजी पुंड रा वाढवणा, भारतीय जनता पार्टी तालुका सरचिटणीस राम महादेव कदम रा. हेर यांची निवड करण्यात आले.

नूतन पदाधिकाऱ्यांना भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले यांनी नियुक्ती पत्र दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, तालुकाध्यक्ष शिवशंकर धुपे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, माजी उपनगराध्यक्ष सुधीर भोसले, ऍड. दत्ताजी पाटील, रामेश्र्वर चांडेश्र्वरे, विजय पाटील, संगम अष्टुरे, सुरेंद्र आकनगिरे, आनंद बुंदे यांच्यासह पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.








**रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त निस्वार्थ सेवाभावी संस्थेमार्फत अंधशाळेत ' नेत्रदानाचा संकल्प ' व तेथील विद्यार्थ्यांना राख्या बांधून , कपडे व फळे वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.एस.पाटील सर होते.उदगीर येथील अरुणा अभय ओस्वाल अंधशाळेत समाजातील काही होतकरू महिलांनी मिळून सामाजिक बांधिलकी या भावनेतून सुरू केलेल्या संस्थेमार्फत पार पडलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.एस.पाटील सरांचे मार्गदर्शन लाभले.. शाळेतील मुलांच्या कलागुणांना हेरुन निस्वार्थ सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ.ज्योतीताई डोळे., उपाध्यक्षा सौ.शिल्पा मलशेटटे, सौ.शोभा बिरादार, सौ.माधुरी बिरादार यांनी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. त्यावेळी संस्थेचे सदस्या कविता तोडांरे , चित्रा मुद्दा, रेणुका अपसिगेंकर, कविता वडजे,निता कस्तुरे, शकुंतला उतकर, ज्या हरकरे व शाळेतील सर्व मुले व मुली उपस्थित होते.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी नवनाथ व समारोप पत्रकार गणेश मुंढे यांनी केले.आलेल्या पाहुण्यांचे आभार रेखा माने यांनी मानले.**

# अन्न पुरवठा सदस्यपदी अभिजीत औटे यांची निवड



उदगीर / प्रतिनिधी- अभिजीत औटे यांची अन्न पुरवठा विभाग व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र शासन लातूर जिल्ह्य दक्षता समिती अशासकीय सदस्य पदी निवड. महाराष्ट्र राज्य क्रिडा युवक कल्याण व बंदरे मंत्री संजय बनसोडे यांच्या शिफारस व ग्राम विकास मंत्री पालकमंत्री लातूर गिरीश महाजन यांच्या शिफारस नुसार लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर खुगे यांनी निवड केली या निवडीबद्दल

आमदार विक्रम काळे आमदार बाबासाहेब पाटील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्ह्यध्यक्ष अफसर शेख कार्याध्यक्ष पंडित धुमाळ महिला जिल्ह्य कार्याध्यक्ष दिपाली औटे प्रदेश सरचिटणीस ॲड व्यंकट बेंद्रे समिर शेख अल्पसंख्यांक विभाग प्रदेश उपाध्यक्ष खाजा तांबोळी जिल्ह्यध्यक्ष शफी हाशमी सामाजीक न्याय विभाग जिल्ह्यध्यक्ष प्रदिप जोधंळे विध्यार्थी जिल्ह्यध्यक्ष सुलेमान शेख उदगीर विधान सभा अध्यक्ष प्रविण भोळे तालुका अध्यक्ष बालाजी भोसले कार्याध्यक्ष वसंत पाटील शहर अध्यक्ष सय्यद जानी कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे महिला शहर कार्याध्यक्ष वैशाली कांबळे युवती शहराध्यक्ष काजल मिरजगावे कार्याध्यक्ष सुनिता तेलंगे राजकुमार चव्हाण महात्मा पब्लिक स्कूल संचालिका संगीता नेत्रगावे आदींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.